दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118
●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२६८ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, बुधवार, १३ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## शासकीय दस्तऐवजावर आता आईचे नाव लावणे बंधनकारक; मंत्रिमंडळाचा महत्वपूर्ण निर्णय

**■ मुंबई, यश सावंत :**
सरकारी दस्तऐवजांवर आता आईचे नाव लावणे बंधनकारक असणार आहे. १ मे २०२४ रोजी व त्यानंतर जन्मलेल्या सर्व बालकांच्या नावाची नोंद बालकाचे नाव आईचे नाव नंतर वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरुपात लावावे. असा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. सर्व कागदपत्रे, महसूली दस्तऐवज, वेतन चिठ्ठी, सेवापुस्तक, विविध परीक्षांच्या अजार्चे नमुने इत्यादी शासकीय दस्तऐवजामध्ये आईचे नाव लावणे बंधनकारक करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने जन्म-मृत्यू नोंदवहीत आवश्यक त्या सुधारणा करुन नोंद घेण्यासाठी केंद्र शासनाशी विचारविनिमय करावा. तसेच केंद्र शासनाकडून याबाबत आदेश प्राप्त झाल्यानंतर जन्म/मृत्यु नोंदवहीत बालकाचे नाव आईचे नाव नंतर वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरुपात नोंद करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.



तर विवाहित स्त्रियांसाठी विवाहानंतरचे नाव नंतर तिच्या पतीचे नाव व आडनाव अशा स्वरूपात नाव नोंदविण्याची प्रक्रिया सुरू ठेवण्यात यावी. स्त्रीला विवाह पूर्वीच्या नावाने मालमत्तेच्या दस्तऐवजामध्ये नोंदविण्याची मुभा ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. अनाथ व तत्सम अपवादात्मक प्रकरणी मुलांच्या जन्म/मृत्यु दाखल्यात नोंद घेण्याबाबत सूट देण्यात येईल असेही शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

## प्रदूषण रोखण्यासाठी एसटी महामंडळाचा पुढाकार ;पालघरमध्ये एलएनजी बसेस धावणार

**■ वसई, सचिन कदम :**
प्रदूषण रोखण्यासाठी आता राज्य परिवहन मंडळाने देखील पुढाखारा घेतला असून आपल्या बसेस द्रवरूप नैसर्गिक वायू (एलएनजी) वर चालविण्याचा निर्णय घेतला आहे. पालघर जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात ३०० बसेस एलएनजीवर धावणार आहेत. प्रोयोगिक तत्वावर ५ बसेस एलएनजीमध्ये रूपांतरित करण्यासाठी पाठविण्यात आल्या आहेत. पालघर जिल्ह्यात वसई, अनार्ळा, नालासोपारा, बोईसर, डहाणू, सफाळे, जव्हार , पालघर असे महामंडळाचे आठ आगार आहेत. या आगारातून ग्रामीण, शहरी व इतर लांब व मध्यम पल्याच्या गाड्या सोडल्या जातात. सर्व आगारात मिळून ४३५ इतक्या एसटीच्या बसेस आहेत. यातील दिवसाला ३९० इतक्या बसेस सोडल्या जातात. यातून मोठ्या संख्येने प्रवासी करतात. आता एसटीच्या बसेस या डिझेल या इंधनावर चालतात. एसटीच्या गाड्यांना दररोज साधारणपणे २५ हजार लीटरहून अधिकचे इंधन (डिझेल) लागते. म्हणजेच दिवसाला २२ ते २३ लाख रुपये इंधनावर खर्च करावे लागत आहे. तर दुसरीकडे अनेक गाड्या जुन्या झाल्या असल्याने त्यातून मोठ्या प्रमाणात काळा धूर बाहेर पडतो यामुळे प्रदूषण होत असते. हे प्रदूषण कमी करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने पुढाकार घेतला आहे. त्याचा एक भाग म्हणून डिझेल बसगाड्या द्रवरूप नैसर्गिक वायू (एलएनजी) या पयार्यी इंधनावर चालणाऱ्या वाहनांमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. पालघर जिल्ह्यातील देखील यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. सुरवातीला प्रायोगिक तत्वावर पालघर विभागातून ५ डिझेल इंधन बस एलएनजी रूपांतर करण्यासाठी देण्यात आल्या असल्याची माहिती विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांनी दिली आहे. त्यानंतर डिझेलवर चालणाऱ्या ३०० बसेस एलएनजी मध्ये रूपांतर केल्या जातील. डिझेलऐवजी एलएनजी इंधनाच्या वापरामुळे तुलनेत प्रदूषणात घट होण्यास मदत होईल व इंधनावर होणाऱ्या खचार्ची बचत होईल असेही जगताप यांनी सांगितले आहे. वसई विरार महापालिकेच्या ई बसेसला विलंब वसई विरार महापालिकेच्या विद्युत बसेसला मात्र आणखी काही महिन्यांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.



## पुणे-लोणावळा उपनगरीय रेल्वे सेवेला ४६ वर्ष



**■ पुणे, अभिजित येरुल्लू :**
पुणे लोणावळा दरम्यान सुरू असलेल्या उपनगरीय रेल्वे सेवेला नुकतीच (११ मार्च २०२४) ४६ वर्ष पूर्ण झाली. सुरुवातीला सात डब्यांची असलेली लोकल आता बारा डब्यांची झाली आहे. मागील ४६ वर्षात लोकल सेवेमध्ये मोठा बदल झाला आहे. ४६ व्या वर्धापन दिनानिमित्त पुणे लोणावळा लोकलचे पूजन झाले. पुणे रेल्वे स्थानकात लोकलची सजावट करून तिला मार्गस्थ करण्यात आले. दररोज लाखो प्रवाशांची ने-आण करणारी लोकल लोहमार्गाच्या आजूबाजूच्या गावांमध्ये आर्थिक सधनतेचे कारण बनली आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड शहरात शिक्षण, नोकरी, व्यवसायानिमित्त जाणारे अनेकजण पुणे लोणावळा लोहमार्गालगत असलेल्या तळेगाव, वडगाव, कान्हे, कामशेत, मळवली आधी ठिकाणी वास्तव्यास आहेत. त्यामुळे या भागाचा आपसूक विकास होऊ लागला आहे

११ मार्च १९७८ रोजी पुणे ते लोणावळा दरम्यान उपनगरीय ईएमयु लोकल सेवेला आरंभ झाला. १९७८ ते २००७-२००८ सालापर्यंत पुणे लोकल ही डीसी (डायरेक्ट करंट) लोकल म्हणून धावत होती. सुरुवातीला लोकलला अवघे सात डबे होते. काही वषार्नंतर दोन डबे वाढवून नऊ डब्यांची लोकल धावू लागली. त्यात पुन्हा वाढ करून आता १२ डब्याची ईएमयु लोकल धावत आहे. मागील ४६ वर्षात एकदाही पुण्याला नवीन फ्रेश फॅक्टरी आऊट ईएमयु रेक मिळाला नाही. मुंबई उपनगरात वापरून पुण्याला दिलेल्या जुन्या रेक मधूनच पुणे-लोणावळा प्रवास होत आहे. २००९-१० मध्ये भेल चा रेक पुण्याला मिळाला. २०१४-१५ मध्ये एसी (अल्टरनेट करंट) ईएमयु धावू लागली. २०१५ ते २०१८ या काळात रेट्रोफिटेड रेकचा वापर करून लोकल धावू लागली. २०१८ ते आत्तापर्यंत सिमेन्स रेक पुणे ते लोणावळा दरम्यान धावत आहे. ४६ वर्ष पूर्ण होत असताना यंदा तरी पुण्याला बंबार्डिअर किंवा मेधा ईएमयुचा नवीन रेक मिळावा, अशी अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त होत आहे. तसेच गेली 46 वर्षात पुणे लोणावळा लोकलच्या फेऱ्यांमध्येही वाढ झालेली नाही. आता स्वयंचलित सिग्नल यंत्रणेचे काम लोणावळा ते पुणे दरम्यान पुर्ण झाल्याने प्रवाशांकडून कार्यालयीन वेळेत लोकलच्या फेऱ्या वाढवण्याची मागणी होत आहे.

तसेच सर्वच स्टेशनवरील फलाटांची लांबी वाढवली असल्याने सकाळच्या व सायंकाळच्या काही फेऱ्या या १५ डब्यांच्या लोकलने पण चालवता येऊ शकतील, अशी आशा देखील प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे.परिणामी हे नुकसान भरून काढण्याकरिता परिवहनला महापालिकेच्या अनुदानावर अवलंबुन राहावे लागणार असल्याचेही बोलले जात आहे.

## महिलांना ५० टक्के सवलत आणि जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवासामुळे टीएमटीला २५ कोटींचा फटका




**■ ठाणे, प्रतिनिधी :**
यंदाच्या ठाणे महापालिकेच्या अर्थसंकल्पात ६० वर्षावरील जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवास तर महिलांना तिकीट दरात ५० टक्के सूट जाहिर केली आहे. ही सवलत १ एप्रिल २०२४ पासून लागू होईल. मात्र या सवलती पायी ठाणे परिवहन सेवेला वषार्ला सुमारे २५ ते ३० कोटींचे नुकसान सहन करावे लागू शकते. परिणामी ही तूट भरून काढण्यासाठी परिवहनला महापालिकेच्या अनुदानावर अवलंबून राहावे लागणार आहे. यापूर्वी वयाची ७५ वर्ष पूर्ण केलेल्या ठाणे महापालिका क्षेत्रात राहणाऱ्या अशा सर्व जेष्ठ नागरिकांना ठाणे महापालिकेच्या बसेसमधून विनामूल्य प्रवास करण्याच्या सुविधेकरिता प्रशासनातर्फे ओळखपत्र देण्यात येत आहे. त्यानुसार १ सप्टेंबर २०२२ पासून अर्ज भरून घेण्यास सुरुवात झाली होती. त्यात फेब्रुवारी २०२४ पर्यंत परिवहन सेवेकडे मोठ्या प्रमाणात अर्ज केले होते. यातील दोन हजार ६०० पुरुष व महिलांना ही मोफत प्रवासाच्या पासची सेवा उपलब्ध करून दिली आहे. तर ६० ते ७४ वर्षापर्यंतच्या जेष्ठ नागरिकांना तिकीट दरात ५० टक्के सूट मिळली होती. आतापर्यंत सहा हजार ६३० जेष्ठ नागरिकांनी फायदा घेतला. मात्र नुकत्याच जाहिर झालेल्या २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात ६० वर्षावरील सर्व जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सूट जाहीर केली आहे. परिणामी, या नागरिकांना आता यापुढे १ एप्रिल २०२४ पासून मोफत प्रवासाची सूट लागू होणार आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात जेष्ठ नागरिकांच्या व्यतिरिक्त महिलांना परिवहन सेवेच्या बसमधून प्रवासात तिकीट ५० टक्के सूट जाहीर केली आहे. ही सवलतही १ मे पासून लागू होईल. या सर्व सवलती लागू झाल्यावर ठाणे परिवहन सेवेला दिवसाला आठ लाख ते १० लाख रुपयांचे नुकसान सहन करावे लागू शकते. तर महिन्याला दोन ते अडीच कोटी तर वषार्ला साधारण तीस कोटींचे नुकसान सहन करावे लागू शकते, असा अंदाज परिवहन मधील सूत्रांनी वर्तवला आहे. सध्या ठाणे परिवहन सेवेचे दिवसाला ३० लाख, महिन्याला दहा कोटी आणि वषार्ला साधारण १२० कोटीचे उत्पन्न आहे. जेष्ठ नागरिकांसह महिलांना सवलत लागू झाल्यावर वषार्ला परिवहन सेवेला सुमारे तीस कोटींचे नुकसान सहन करावे लागू शकते, अशी सूत्रांनी दिली. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन, त्यांची देणी देण्याचे आव्हान परिवहन सेवेपुढे उभे राहील. परिणामी हे नुकसान भरून काढण्याकरिता परिवहनला महापालिकेच्या अनुदानावर अवलंबुन राहावे लागणार असल्याचेही बोलले जात आहे.

## धारावीत १८ मार्चपासून सर्वेक्षणाला सुरुवात



**■ मुंबई, भावना जैन :**
धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत धारावीतील रहिवाशांचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याचा निर्णय धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रायव्हेट लिमिटेडने (डीआरपीपीएल) घेतला आहे. या सर्वेक्षणाला १८ मार्चपासून सुरुवात होणार आहे. विशेष संगणकीय प्रणालीद्वारे संगणकीय पद्धतीने रहिवासी, बांधकामांची माहिती संकलित केली जाणार आहे. या सर्वेक्षणाला धारावीतील कमला रमण नगर येथून सुरुवात होणार आहे. या माहितीच्या आधारे पुढे रहिवाशांची पात्रता निश्चिती केली जाणार आहे. त्यामुळे हे सर्वेक्षण अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. धारावीचा कायापालट करण्यासाठी राज्य सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्प हाती घेतला आहे. अदानी समूहाला पुनर्विकासाचे कंत्राट देण्यात आले. आता आणखी एक पाऊल पुढे टाकून येथील बांधकाम, रहिवाशांचे सर्वेक्षण सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सर्वेक्षणाला १८ मार्चपासून सुरुवात होणार असल्याची माहिती धारावी पुनर्वसन प्रकल्पाचे (डीआरपी) मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी दिली.

संगणकीय पद्धतीने हे सर्वेक्षण होणार असून यासाठी विशेष संगणकीय प्रणालीचा वापर केला जाणार आहे. प्रत्येक सदनिकेला, बांधकामाला एक विशिष्ट क्रमांक दिला जाणार असून संबंधित गल्ल्यांचे लेसर मॅपिंग केले जाणार आहे. या सर्वेक्षणादरम्यान रहिवाशांना कोणत्याही अडचणी आल्या वा सर्वेक्षणाबाबत काही प्रश्न असतील तर त्याचे, अडचणींचे निरसन करण्यासाठी डीआरपीपीएल हेल्पलाईन क्रमांक जाहीर केला आहे. रहिवाशांना आपल्या शंकांचे निरसन करण्यासाठी मदत क्रमांक १८०० २६८ ८८८८ वर संपर्क साधता येईल.

## रेसकोर्सवरील सेंट्रल पार्कला सरकारची मंजुरी



**■ मुंबई, प्रतिनिधी :**
महालक्ष्मी रेसकोर्सच्या १२० एकर जागेत आंतरराष्ट्रीय दजार्चे भव्य ह्यमुंबई सेंट्रल पार्कह्न विकसित करण्यास झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. महालक्ष्मी रेसकोर्स येथील मे .रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि. यांना भाडेपट्टयाने दिलेल्या भूखंडावरील कराराची मुदत संपुष्टात आल्यामुळे या ठिकाणी भव्य उद्यान विकसित करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महापालिका आयुक्तांना दिले होते.

महापालिका आयुक्त इक्बालसिंह चहल यांनी रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब आणि महालक्ष्मी फ्लॅट्स इस्टेट यांच्या बैठकीत सरकारची मध्यवर्ती उद्यानाची संकल्पना मांडली. त्यावर चचेर्अंती ७०८ पैकी ७६.२७ टक्के म्हणजेच ५४० सभासदांनी या जागेवर उद्यान विकसित करण्यास परवानगी दिली होती. रेसकोर्स येथील रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि. यांच्याकडे शिल्लक राहिलेल्या ९१ एकर जागेचा भाडेपट्टयाचे सन २०५३ पर्यंत नूतनीकरण करण्यात मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी असलेल्या झोपडयांचे पालिका आणि राज्य सरकार पुनर्वसन करणार असून या ठिकाणी असलेले तबेलेही सरकार हटविणार आहे. त्याबदल्यास रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबने नवीन भाडेपट्टा करार करताना रेसकोर्स आणि तेथील क्लब हाऊसमध्ये मुख्यमंत्र्यांना ५० निशुल्क आजीवन सदस्य नामनिर्देशित करण्याचे अधिकार असतील. तर पालिका आयुक्तांना आजीवन निशुल्क सदस्यत्व तसेच पत्त्येक वर्षी एक आजीवन सदस्य नामनिर्देशित करण्याचे अधिकार असतील अशा अटी घालण्यात आल्या आहेत.

## गर्दीच्या वेळेव्यतिरिक्त नितीन कंपनी चौकातील सिग्नल कायमस्वरूपी

**■ ठाणे, रोहित जैसवाल :**
ठाणे शहरातील अतिशय गजबजलेल्या नितीन कंपनी चौकातील सिग्नल यंत्रणा गर्दीच्या वेळे व्यतिरिक्त म्हणजेच, सकाळी आणि सायंकाळ वगळता इतर वेळेत कायमस्वरूपी कार्यान्वित केला आहे. या सिग्नल यंत्रणेमुळे दिवसा बेशिस्त पद्धतीने होणाऱ्या वाहतुकीला आळा बसला आहे असे पोलिसांचे म्हणणे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या चौकातील सिग्नल यंत्रणा प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली जात होती. परंतु त्याबाबत निर्णय होत नसल्याने काही दिवसांत ही यंत्रणा बंद करावी लागत होती. ठाणे शहरातील पूर्व द्रुतगती महामार्गावरील तीन हात नाका, नितीन कंपनी आणि कॅडबरी जंक्शन हे तीन चौक महत्त्वाचे आहे. यातील तीन हात नाका आणि कॅडबरी जंक्शन येथील चौकात सिग्नल यंत्रणा कार्यान्वित आहेत. नितीन कंपनी चौकाला महामार्गासह इतर एकूण चार रस्ते या मागार्ला जोडले जातात. परंतु हे रस्ते अरुंद आहेत. त्यामुळे रात्री आणि सकाळच्या वेळेत मार्गावर मोठी वाहतुक कोंडी होत असते. अनेक पादचारी येथून रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करत असतात. महापालिकेने येथील चौकात सिग्नल बसविला आहे. हा सिग्नल सुरू नाही. त्यामुळे चौकातील वाहतुक कोंडी नियंत्रित करण्यासाठी पोलीस कर्मचारी आणि वाहतुक साहाय्यक चौकात उभे असतात. मागील अनेक वर्षांपासून येथे प्रायोगिक तत्त्वावर आठवडाभर सिग्नल यंत्रणा सुरू करण्यात येत होते. सिग्नल सुरू केल्यास रात्रीच्या वेळेत वाहतूक कोंडी वाढत होती. त्यामुळे अनेकदा हे प्रायोगिक प्रयत्न अयशस्वी ठरत होते. काही दिवसांपूर्वी वाहतूक नियंत्रण शाखेचे उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड यांनी चौकात पाहाणी केली. तसेच सिग्नल यंत्रणाच्या वेळा ठरवून दिल्या आहेत. त्यानुसार, सुमारे आठवड्याभरापासून या चौकात सकाळी ११ ते सायंकाळी चार किंवा पाच या वेळेत सिग्नल यंत्रणा कार्यान्वित केली जात आहे. सायंकाळी वाहनांची वर्दळ वाढल्यानंतर पुन्हा सिग्नल यंत्रणा बंद केली जाते. तसेच रात्री ९ नंतर वाहनांची वर्दळ कमी झाल्यास सिग्नल यंत्रणा पुन्हा सुरू केली जाते. सिग्नल यंत्रणा सुरू झाल्याने दुपारी चौकात बेशिस्त वाहन चालकांना चाप बसला असल्याचे वाहतूक पोलिसांचे म्हणणे आहे.




## जबाबदारी पालिकेचीच, रस्त्यांच्या स्थितीबाबत उच्च न्यायालयाकडून बीएमसीची कानउघाडणी



**■ मुंबई, विशाल कारंडे :**
खराब रस्ते व खड्डयांमुळे होणाऱ्या प्रत्येक अपघातावर आम्ही देखरेख ठेवू शकत नाही. तसे करणे कठीण आहे. सरतेशेवटी नागरिकांना व वाहनचालकांना रहदारीसाठी चांगले रस्ते उपलब्ध करणे ही मुंबई महापालिकेची जबाबदारी आहे, अशा तिखट शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी पालिकेची कानउघाडणी केली. तसेच ह्यमागच्या मान्सूनमध्ये खड्डे बुजवण्यासाठी २७३ कोटी रुपये खर्च केल्याचा दावा पालिकेचा दावा असेल तर अजूनही रस्त्यांवर खड्डे कसे आहेत!, असे आश्चर्यही न्यायालयाने व्यक्त केले. खराब रस्ते, उघडे मॅनहोल व खड्डयांच्या प्रश्नावर उच्च न्यायालयाने २०१८मध्येच स्पष्ट आदेश दिलेले असतानाही त्यांचे पालन झाले नसल्याने ॲड. रुजू ठक्कर यांनी अवमान याचिका केली आहे. या याचिकेवर मुख्य न्यायमूर्तीखालील खंडपीठाकडून सातत्याने सुनावणी सुरू आहे. ॲड. रुजू यांनी यापूर्वी खड्डयांमुळे झालेल्या अपघाताच्या काही घटना निदर्शनास आणल्या होत्या. त्याची दखल घेत खंडपीठाने चौकशीचे निर्देश दिले होते. डिसेंबर महिन्यात खंडपीठाने पवई येथे दुचाकीस्वाराच्या झालेल्या अपघाताच्या घटनेबाबत उत्तर मागितले होते. त्यानुसार पालिकेने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राकडे रुजू यांनी सोमवारच्या सुनावणीत लक्ष वेधले. ज्या ठिकाणी दुचाकीस्वार खड्डयात पडला तो रस्ता नौदलाचा असल्याचे पालिकेने म्हटले आहे. मात्र, प्रसारमाध्यमांतील फोटो पाहता एका शाळेबाहेर मोठा खड्डा खणल्याचे दिसत आहे, असे रुजू यांनी निदर्शनास आणले. तसेच मालाडमध्ये अनेक ज्येष्ठ नागरिक खराब पदपथांविषयी तक्रारी करत असल्याचेही त्यांनी सांगितले. तेव्हा, खंडपीठाने ह्यप्रत्येक अपघाताच्या घटनेबाबत न्यायालय देखरेख करू शकत नाही. कारण सरतेशेवटी चांगले रस्ते देण्याची जबाबदारी पालिकेची आहे.

## सिडकोच्या घरासाठी वृद्धाची सोळा लाखांना फसवणूक

**■ नवी मुंबई, दिगंबर जाधव :**
सिडकोच्या घरासाठी घेतलेल्या सुमारे सोळा लाखांचा अपहार करून फसवणूक झाल्याचा प्रकार गोरेगाव परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी महेश गोपाळ सुर्वे या एजंटविरुद्ध गोरेगाव पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा नोंदवला आहे. ६५ वर्षांचे तक्रारदार हे नवी मुंबईतील जुईनगरचे रहिवासी असून ते नायर रुग्णालयातून निवृत्त झाले आहेत. त्यांना निवृत्तीतून मिळालेल्या पैशांतून घरखरेदी करायची होती. सुर्वे याने त्यांना घर दाखवले.




त्यासाठी सुर्वेच्या एस. एंटरप्राईजेस कंपनीच्या बँक खात्यात २७ लाख २५ हजार रुपये हस्तांतर केले होते. मात्र, घराची कागदपत्रे देण्यास तो टाळाटाळ करत होता आणि पैसेही देत नव्हता. दरम्यानच्या काळात त्याने साडेअकरा लाख परत केले, मात्र सोळा लाखांचा दिलेला धनादेशही वटला नाही. त्यामुळे तक्रारदाराने त्याच्याविरोधात गोरेगाव पोलिसांत धाव घेतली होती.

## एसी लोकलमध्ये 'खाकी'ची घुसखोरी; प्रवाशांची गैरसोय

**■ मुंबई, विशाल पाटील :**
एसी लोकल आणि प्रथम श्रेणीचा महिला डब्यात सर्रासपणे विनातिकीट खाकी वदीर्धारी आणि रेल्वे कर्मचारी चढत असल्याने पासधारक प्रवाशांना बसण्यासाठी जागा राहत नाही. त्यामुळे महिला प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. परिणामी, आता खाकी वदीर्धारी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांविरोधात महिला प्रवासी आक्रमक झाल्या असून या संदर्भात रेल्वेकडे तक्रारी आल्या आहे. त्याकडे रेल्वे प्रवाशांकडून दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. मुंबईकर गारेगार प्रवासासाठी एसी लोकलमधून प्रवास करतात. सध्या एसी लोकलच्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. अशात अपुऱ्या एसी लोकलच्या फेऱ्यांमुळे अगोदरच प्रवासी हैराण झाले आहेत. त्यात एसी लोकलचे महागडे तिकीट आणि पास काढून घुसखोरांना दररोज तोंड द्यावे लागत असल्याचे तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक खाकी वदीर्तील जीआरपी आणि आरपीएफ कर्मचारी सर्रासपणे विनातिकीट एसी लोकलमधून प्रवास करताना दिसत आहेत. अनेकदा एसी लोकलमधील कर्तव्यावर असलेल्या तिकीट तपासनीसांकडे तक्रारी केल्यानंतर फक्त समज देऊन कर्मचाऱ्यांना उतरविण्यात येते. मात्र त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जात नाही. हे प्रकार सर्रासपणे गर्दीच्या वेळी म्हणजे सकाळी आणि संध्याकाळी घडतात. त्यामुळे एसी लोकल आणि प्रथम श्रेणीच्या पासधाकर आणि तिकीटधारक प्रवाशांची मोठी गैरसोय होते. ऐन गर्दीच्या वेळी रेल्वे कर्मचारी आणि खाकीवदीर्तील महिला कर्मचाऱ्यांची टोळी एसी लोकलमध्ये शिरतात आणि जागा अडवून ठेवतात. या संदर्भात जाब विचारल्यास अनेकदा महिला प्रवाशांशी टोळीतील कर्मचारी हुज्जत घालत असल्याचे प्रकार घडले आहे. याशिवाय महिला प्रथम श्रेणीच्या डब्यात सर्रासपणे गणवेशातील कर्मचारी चढतात.




# व्हेजिटेबल स्ट्यू

**साहित्य :** मिक्स भाज्या (फरसबी, गाजर मध्यम आकारात चिरून), फ्लॉवरचे तुकडे, मटार), २ मध्यम कांदे (उभे चिरून), २ मध्यम बटाटे (साल काढून चौकोनी कापलेले), नारळाचे दूध एक पाकीट (घरी केलेले किंवा रेडिमेड, (होममेड ब्रँडचे मिळते), आलं पेस्ट १ चमचा, लसूण पेस्ट १ चमचा, बारीक चिरलेली हिरवी मिरची, कढीपत्ता, खडा मसाला, वेलची, काळी मिरी (अख्खी), दालचिनी, काजू पेस्ट (८-१० काजू), खाण्याचे तेल (edible कोकोनट ऑईल), मीठ.

**कृती :** प्रथम एका पॅनमध्ये थोडं खाण्याचे तेल गरम करूव घ्यावे. त्यामध्ये खडा मसाला घालून चांगले परतावे. त्यानंतर त्यात उभा चिरलेला कांदा घालून परतावा. तो गुलाबीसर झाल्यावर त्यात बारीक चिरलेली हिरवी मिरची, एक चमचा आल्याची पेस्ट, एक चमचा लसूण पेस्ट घालून छान परतून घ्यावे.

नंतर पॅनमध्ये सर्व (मिक्स) भाज्या व चौकोनी चिरलेले बटाटे घालून परतून घ्यावे. नंतर त्यात सर्व भाज्या बुडतील इतपत पाणी घालून पॅनवर झाकण घालून



भाज्या अर्ध्या कच्च्या शिजवाव्यात. नंतर त्यामध्ये नारळाचे दूध घालून ढवळावे आणि त्याला एक उकळी आल्यावर काजू पेस्ट व मीठ घालावे. सर्वात शेवटी त्यावर कढीपत्ता बारीक चिरून घालावा आणि सर्व मिश्रण व्यवस्थित शिजवून घ्यावे.

**टीप :**

▮काळीमिरी अख्खीच घालावी, त्याचा स्वाद छान लागतो आणि उगाच तिखट लागत नाही.

▮ हे स्ट्यू तुम्ही नुसते खाऊ शकता अथवा गरमागरम

# उत्तम सौंदर्य प्रसाधन : डाळीचे पीठ

**डाळीचे पीठ म्हणजे हरभऱ्याच्या डाळीचे पीठ ज्याला सध्या बेसन पीठ म्हणण्याची पद्धत आहे. बेसन पिठाचे दुधात मिश्रण करून ते मिश्रण चेहऱ्याला लावल्यास चेहरा विलक्षण तजेलदार होतो.**



**विविध** साबणांच्या जाहिरातींमध्ये मॉडेल म्हणून काम करणाऱ्या एका चित्रपट तारकेला एका पत्रकाराने मोठा विचित्र प्रश्न विचारला. तुम्ही एवढ्या जाहिरातींमध्ये मॉडेल म्हणून काम करता, मात्र तुम्ही स्वतः नेमके कोणते साबण वापरता? तुमच्या सौंदर्याचे रहस्य कोणत्या साबणात दडलेले आहे? त्या चित्रपट तारकेने मंद स्मित करून उत्तर दिले, 'माझ्या सौंदर्याचे रहस्य डाळीच्या पिठात दडलेले आहे.' पत्रकार अचंबित झाला. परंतु अजूनसुद्धा भारतामध्ये अशा अनेक महिला आहेत की, ज्या शरीराला साबणाचा स्पर्श होऊ देत नाहीत. तरी त्यांची त्वचा चांगली आहे, त्या सुंदर आहेत.

जुन्या काळात जेव्हा साबण उपलब्धच नव्हता, तेव्हा लोक डाळीचे पीठ अंगाला लावून आंघोळ करत होते आणि आतासुद्धा अगदी आधुनिक काळातही डाळीच्या पिठाचा साबणासारखाच नव्हे, तर इतर अनेक प्रकारांनी सौंदर्य प्रसाधन म्हणून वापर केला जात आहे. डाळीचे पीठ म्हणजे हरभऱ्याच्या डाळीचे पीठ ज्याला सध्या बेसन पीठ म्हणण्याची पद्धत आहे. बेसन पिठाचे दुधात मिश्रण करून ते मिश्रण चेहऱ्याला लावल्यास चेहरा विलक्षण तजेलदार होतो. हे मिश्रण करताना त्यात थोडी हळद मिसळावी. हे मिश्रण चेहऱ्याला २० मिनिटे लावून ठेवावे आणि नंतर कोमट पाण्याने धुवावे. अशा प्रकारचे मिश्रण वर्षानुवर्षे



वापरले जात आहे. परंतु आता बेसन पिठाच्या वापराचे अधिक संशोधन करून त्याला अधिक शास्त्रीय रूप दिले जात आहे. बेसन पीठ दुधाच्या ऐवजी गुलाब पाण्यात मिसळून त्याचे मिश्रण चेहऱ्याला लावले तर त्याचा गुण अधिक चांगला येतो, असे अलीकडच्या प्रयोगात आढळले आहे. मात्र हे मिश्रण कोरड्या त्वचेच्या लोकांनी वापरायचे नाही. तेलकट त्वचेच्या लोकांनी ते वापरले की, तेलकटपणा कमी होतो.

कोरड्या त्वचेच्या लोकांसाठी तेलकटपणा कमी करण्याचा प्रश्नच येत नाही. तेव्हा अशा लोकांनी बेसन पीठ आणि मध यांचे मिश्रण करावे. त्यात थोडे दूध आणि किंचित हळद पावडर टाकावी. आठवड्यातून एकदा हे मिश्रण चेहऱ्याला २० मिनिटांसाठी लावावे. त्यामुळे त्वचा ओलसर होते. उन्हामुळे पडणारे काळे डाग

# भाज्या शिजवताना हे टाळा

जीवनसत्त्वांची खाण असते ती भाज्यांमध्ये. म्हणूनच आपल्याकडे पूर्वापार कानीकपाळी ओरडून भाज्या खायला सांगितल्या जातात. बहुतेकांच्या आहारात भाज्यांचा समावेश असतो. मात्र, भाज्या शिजवताना आपण काही गोष्टींकडे लक्ष देत नाही. त्यामुळे भाज्यांमधील आरोग्यदायी वैशिष्ट्ये लोप पावतात. असे होऊ नये म्हणून...



**आपण** ताज्या भाज्या आणतो तेव्हा त्यात असणारे पोषक घटक फार वेळ कायम राहत नाहीत. काही दिवसांनंतर ताज्या, तजेलदार, करकरीत असणाऱ्या भाज्या पिवळ्या पडतात, सुकून जातात. भाज्या शिजवताना देखील काही चुका करतो, त्यामुळे तर या भाज्यांमधील पोषकता आणखीन घटते.

**खूप लवकर शिजवून ठेवणे :** आपण भाज्या स्वच्छ धुवून कापल्या की त्यातील घटकांचा हवेशी संपर्क होतो. शिवाय खराब झाल्याने मरगळल्याने या भाज्यांतील पोषक घटक नष्ट होतात. त्यामुळे भाज्या वापरायच्या असतील तेव्हाच त्या चिरून घ्या. हीच गोष्ट पालेभाज्यांची. पालेभाज्या धुतल्या की त्या लगेचच शिजवल्या पाहिजेत. नाही तर त्या सुकून जाऊ लागतात.

**भाज्या अतिशिजवणे :** काही भाज्या अतिशिजवल्यास त्यांचा रंग बदलतो. काही भाज्यांचा रंग काळपट होतो. उदा. ब्रोकोली. सुंदर हिरवीगार, चकचकीत हिरव्या रंगाची ब्रोकोली आपण भांड्यात शिजायला घालतो त्यावेळी ब्रोकोलीचा हिरवागार रंग फिका व्हायला लागतो. अतिशिजवल्याने तो काळपट होतो.

भाज्या सहज खाता येतील इतपतच शिजवाव्यात. त्यामुळे त्यांची चवही चांगली लागते आणि दिसतातही छान. खूप शिजवून लगदा झाल्यास त्यातून पोषक तत्त्वे मिळत नाहीत. काही भाज्या आपण पाण्यात शिजवतो किंवा उकडतो. आचेवरून उतरवल्यानंतरही काही काळ शिजण्याची प्रक्रिया सुरूच असते.

आचेवरून उतरवून या भाज्या दोन मिनिटांसाठी गार पाण्यात घालाव्यात त्यामुळे त्यांची शिजण्याची प्रक्रिया बंद होते. त्यामुळे भाज्यांचा हिरवागार रंगही तसाच राहतो आणि पोषकतत्त्वेही.

**पॅनमध्ये गर्दी नको :** भाज्या शिजवताना पॅनमध्ये भाज्यांची गर्दी करू नका. त्यामुळे भाज्या करकरीत होण्याऐवजी फक्त शिजतील. जास्त भाज्या शिजवायच्या असतील तर थोड्या थोड्या करून शिजवा किंवा मोठे भांडे वापरा.

# स्पॅम कॉलने त्रस्त आहात? तुमचा मोबाइल नंबर त्यांच्याकडे 'असा' पोहोचला, जाणून घ्या

स्पॅम कॉल आता सामान्य बाब झाली आहे. दिवसभरात अनेक स्पॅम कॉल्स अनेकांना येत असतात. कधी कधी तर कामात बिझी असताना अचानक फोनची रिंग वाजते. आपण जितक्या तत्परतेने कॉल घेतो. तितक्यात तत्परतेने आपला भ्रमनिराश होतो. त्यानंतर नाहक आपल्याला मनस्ताप होतो. स्पॅम कॉल करणाऱ्यांना दिवसभरात किती लोकांना कॉल करायचे आहे, हे टार्गेट दिलेले असता. त्यामुळे ते कधीही कुणालाही कॉल करत असतात. अनेकांना महत्त्वाच्या कामावेळी आवश्यक कॉल्सपेक्षा बिनकामाचे कॉल्स जास्त येतात. कधी लोनसाठी कॉल येतात, तर कधी इन्शूरन्ससाठी कॉल येतात. काही कॉल्स तर कट केल्यानंतरसुद्धा सतत येतात. त्या कॉलला ब्लॉक केल्यानंतर ते दुसऱ्या नंबरवरून कॉल करतात. त्यामुळे आपला मोबाइल नंबर त्यांच्यापर्यंत कसा पोहोचला हे अनेकांना कळतच नाही. स्पॅम कॉलर्सकडे तुमचा मोबाइल नंबर कसा पोहोचला हे सविस्तर जाणून घ्या.

**स्पॅम कॉलर्सला तुमचा नंबर कसा मिळाला**

स्पॅम कॉल आणि मेसेजमुळे तुम्ही त्रस्त आहात. तुमचा मोबाइल नंबर फक्त नंबर नाही. तर अनेक गोष्टींना तो लिंक्ड केलेला आहे. यात तुमचा डेटा असून त्यात नाव, वय, आणि आवश्यक माहिती असते. तुमचा नंबर किंवा खासगी माहिती शेअर करत असाल तर ती तुमच्यासाठी चांगली गोष्ट नाही. तुम्ही जर कोणत्याही वेबसाइटवर जात असाल किंवा अन्य एखाद्या ॲपला डाऊनलोड करत असल्यास त्या ठिकाणी तुम्ही तुमचा नंबर टाकत असतात. त्यावेळी तो नंबर सेव्ह केला जातो.





**अनेक जण पडतात बळी**

कॉल्स आणि एसएमएस येत असल्याने अनेकजण याला बळी पडतात. एसएमएसमधून फसवण्यासाठी लॉटरी आणि फ्री ऑफर्सचे आमिष दाखवले जाते. लोक फसून आपली बँक डिटेल्स शेअर करतात. ज्यात त्यांचे बँक अकाऊंटमधील पैसे अवघ्या काही मिनिटांत खाली होतात. या प्रकारच्या स्कॅमला ट्रेंड सिंडिकेट्सद्वारा चालवले जाते. त्यामुळे आपण चुकूनही कुणासोबत नंबर शेअर करण्याआधी ही वेबसाइट फेक तर नाही ना, याची खात्री करून घ्यायला हवी.

**यात तुमची चूक**

तुम्हाला जे स्पॅम कॉल येतात त्यात चूक कुणाची आहे. तुमची आहे की, अन्य कुणाची हे पाहणे आवश्यक आहे. तुम्ही जर वेबसाइटवर आपली खासगी माहिती टाकत असाल, तर तो मोबाइल नंबर लीक होतो. त्यानंतर फोन कॉल्स येणे सुरू होते. लोन आणि बँकिंग संबंधित सर्व्हिसेस सोबत असे होते. अनेकदा आपण कुणी तरी लिंक दिली म्हणून ओपन करतो. त्यात तुमचा नंबर एन्टर करायला सांगितले जाते. त्यानंतर आपण क्षणाचाही विचार न करता आपला नंबर एन्टर करतो. तोच नंबर ती साइट सेव्ह करून अन्य लोकांना पुरवत असतात, अशा प्रकारे आपला नंबर एकाकडून दुसऱ्याकडे आणि दुसऱ्याकडून तिसऱ्याकडे जात असतो.

**या ॲप्सच्या मदतीने करा स्पॅम कॉल्सला ब्लॉक**

**ट्रूकॉलर :** या ॲपचा सर्वात जास्त वापर केला जातो. हे ॲप अज्ञात नंबरला ओळखण्यास मदत करतो. फ्रॉड कॉल्स, स्पॅम कॉल्सची ओळख करते. तसेच ब्लॉक करते. या ॲपद्वारे तुम्ही कोणत्याही नंबरला ब्लॅकलिस्ट करू शकता. तसेच त्याला ब्लॉक करू शकता.

**कॉल ब्लॅकलिस्ट :** हेसुद्धा एक चांगले ॲप आहे. ॲप कॉल आणि एसएमएस दोन्हीसाठी कॉल ब्लॉकर आहे.

**हे ॲप पडतील उपयोगी**

**कॉल ब्लॉकर :** या ॲपद्वारे कॉल सेंटर, स्पॅम नंबर, रोबोकॉल, टेलिमार्केटिंग अशा अज्ञात कॉलला ब्लॉक करण्याचे काम करतो.

Should I Answer? हे ॲपसुद्धा एक बेस्ट ऑप्शन आहे. या ॲपमध्ये स्पॅम नंबरचा मोठा डेटाबेस आहे. जे लागोपाठ अपडेट असते. जर कोणी कॉल करण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्याला ब्लॉक करते. या ॲपद्वारे इंटरनॅशनल कॉल्सही ब्लॉक केले जातात.

# आशा भोसलेंच्या नातीचं बॉलिवूडमध्ये पदार्पण

बॉलिवूडच्या सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले आज ९०व्या वर्षीही आपल्या आवाजानं रसिकांच्या मनावर गारुड घालतात. दिग्गज गायिका आशा भोसले यांची नात जनाई भोसले सोशल मीडियावर खूप चर्चेत असते. जनाई लवकरच मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. ती एका ऐतिहासिक चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण करणार आहे. आशा भोसलेंसमोर दिग्दर्शकाने जनाईला सिनेमात घेत असल्याची घोषणा केली आहे. जनाई ही तिची आजी आशा भोसले यांच्याबरोबर अनेक कार्यक्रमांना हजेरी लावत असते. जनाई तिची गायकी आणि सौंदर्यामुळेही खूप चर्चेत असते. आता तिच्या चाहत्यांना तिला मोठ्या पडद्यावर पाहण्याची संधी मिळणार आहे. जनाईचा पहिला चित्रपट हा इतिहासकालीन असून त्याची नुकतीच घोषणा झाली आहे. कोणता आहे हा सिनेमा जाणून घ्या. बॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक संदीप सिंग येणाऱ्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारित सिनेमा बनवण्याच्या तयारीत आहेत. या चित्रपटाचं नाव द प्राईड ऑफ भारतः छत्रपती शिवाजी महाराज असं आहे. या सिनेमातच जनाई झळकणार आहे. जनाई या चित्रपटात शिवरायांच्या पत्नीची म्हणजेच महाराणी सईबाई यांची भूमिका साकारणार आहे. हा चित्रपट १९ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रदर्शित होईल. दिग्दर्शक संदीप सिंह जनाईला लाँच करणार आहेत. आशा भोसले यांच्याप्रमाणेच जनाई ही एक उत्तम गायिका आहे. तिला संगीताची आवड आहे. शिवाय, ती एक उत्तम डान्सर देखील आहे. जनाईच्या या गुणांचाच विचार करून, राणी सईबाई भोसलेंच्या भूमिकेसाठी तिची निवड करण्यात आली आहे.



## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ३०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 1 | | 6 | | 2 | | 4 | |
| 3 | | 2 | | | | | 8 | |
| | 7 | | | 8 | 1 | | | 3 |
| | | 9 | | 5 | | 3 | 7 | |
| | 2 | 7 | | | 3 | | | 4 |
| | | 4 | 2 | | | 5 | | |
| 2 | | 5 | 9 | | 6 | | | |
| | | | | | | | | 6 |
| 8 | | 3 | 4 | 7 | | 1 | | |

## उत्तर सुडोकू -२९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 9 | 3 | 1 | 2 | 4 | 8 | 6 | 5 |
| 6 | 2 | 5 | 8 | 3 | 7 | 1 | 4 | 9 |
| 1 | 8 | 4 | 9 | 5 | 6 | 2 | 3 | 7 |
| 8 | 1 | 7 | 2 | 4 | 9 | 3 | 5 | 6 |
| 9 | 3 | 6 | 7 | 8 | 5 | 4 | 1 | 2 |
| 5 | 4 | 2 | 3 | 6 | 1 | 7 | 9 | 8 |
| 2 | 7 | 1 | 6 | 9 | 3 | 5 | 8 | 4 |
| 3 | 5 | 9 | 4 | 7 | 8 | 6 | 2 | 1 |
| 4 | 6 | 8 | 5 | 1 | 2 | 9 | 7 | 3 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# थलपती विजयचा 'CAA'ला विरोध! तामिळनाडू सरकारला पत्र

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने सोमवारी ११ मार्च रोजी नागरिकत्व दुरुस्ती कायदा CAA लागू करण्याची घोषणा केली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी उअअ हा भाजपच्या जाहीरनाम्याचा अविभाज्य भाग होता. भाजप सरकार सत्तेवर आल्यानंतर संसदेने ११ डिसेंबर २०१९ रोजी तो लागू केला. मात्र, आता दक्षिण भारतातून CAA ला कडाडून विरोध होत असल्याचे दिसत असून, या कायद्याविरोधात लोक आवाज उठवू लागले आहेत. प्रसिद्ध साऊथ अभिनेता- राजकारणी थलापती विजय याने देखील CAA ला कडाडून विरोध केला आहे. इतकेच नाही तर, तर त्याने तामिळनाडू सरकारला पत्र लिहून आवाहन देखील केलं आहे. थलापती विजय याने नागरिकत्व सुधारणा कायदा न स्वीकारण्याची घोषणा केली आहे. यासोबतच त्यांनी तामिळनाडू सरकारला CAA मंजूर न करण्याचे आवाहनही केले आहे. सोमवारी संध्याकाळी सीएएशी संबंधित अधिसूचना जारी झाल्यानंतर, थलापती विजय याने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर आपली नाराजी व्यक्त केली आहे. ट्विट करताना त्याने लिहिले की, सीएएची अंमलबजावणी मान्य नाही. ज्या वातावरणात देशातील सर्व नागरिक सामाजिक एकत्र आनंदाने रहात आहेत, तेथे भारतीय नागरिकत्व सुधारणा कायदा २०१९ (CAA) सारख्या कोणत्याही कायद्याची अंमलबजावणी आम्हाला मान्य नाही.हा कायदा तामिळनाडूमध्ये लागू करू नये, अशी विनंती विजयने तामिळनाडू सरकारला केली. या कायद्याची तामिळनाडूमध्ये अंमलबजावणी होणार नाही याची राजकारण्यांनी खात्री करावी. असेही विजयने त्याच्या निवेदनात नमूद केले आहे. विजय व्यतिरिक्त, इतर विरोधी नेत्यांनीही नागरिकत्व (दुरुस्ती) कायद्याचे नियम अधिसूचित केल्याबद्दल केंद्र सरकारवर टीका केली आहे.



## दिनविशेष

**१३ मार्च**

- ◆१७८१: विल्यम हर्षेल यांनी युरेनसचा शोध लावला.
- ◆१८९७: सॅन डीयेगो विद्यापीठाची स्थापना झाली.
- ◆१९१०: पॅरिसहुन लंडनला येताच स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अटक झाली.
- ◆१९३०: क्लाईड डब्ल्यू. टॉमबॉग यांनी प्लुटो ग्रह शोधल्याचे हार्वर्ड विद्यापीठातील वेधशाळेला कळवले.
- ◆१९४०: अमृतसर येथील जालियनवाला बाग हत्याकांडाचे समर्थन करणारे पंजाबचे गव्हर्नर मायकेल ओडवायर यांची उधमसिंग यांनी गोळ्या घालून हत्या केली.
- ◆१९९७: मदर तेरेसा यांच्या वारस म्हणून सिस्टर निर्मला यांची निवड करण्यात आली.
- ◆१९९९: कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या चौथ्या टप्प्याचे उद्घाटन झाले.
- ◆२००३: मुंबई शहरातील लोकल रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट झाले.
- ◆२००७: वेस्ट इंडीजमधे ९ व्या क्रिकेट विश्वकरंडक क्रिकेटस्पर्धेचे उद्घाटन झाले.
- ◆१७३३: इंग्लिश रसायनशास्त्रज्ञ जोसेफ प्रिस्टले यांचा जन्म. (मृत्यू: ६ फेब्रुवारी १८०४)
- ◆१८९६: प्राच्यविद्या संशोधक महामहोपाध्याय डॉ. वासुदेव विष्णू मिराशी यांचा जन्म. (मृत्यू: ३ एप्रिल १९८५)
- ◆१९२६: ललितलेखक रवींद्र पिंगे यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर २००८)
- ◆१९३८: ४९वे योकोझुना जपानी सुमो तोचीनौमी तेरुयोशी यांचा जन्म.

१३ मार्च मृत्यू

- ◆संपूर्ण दिनविशेष दिनदर्शिकाः येथे क्लिक करा आणि लगेच डाऊनलोड करा आपल्या मोबाईल / कॉम्पुटर मध्ये. (75% ऊ्रूङ्ग४ल्ल३)
- ◆१८००: पेशवे दरबारातील एक मंत्री नानासाहेब फडणवीस यांचे निधन. (जन्मः १२ फेब्रुवारी १७४२ झ्र सातारा)
- ◆१८९९: दत्तात्रेय कोंडो घाटे उर्फ कवी दत्त यांचे निधन. (जन्मः २७ जून १८७५)
- ◆१९०१: अमेरिकेचे ३३वे राष्ट्राध्यक्ष बेंजामिन हॅरिसन यांचे निधन. (जन्मः २० ऑगस्ट १८३३)
- ◆१९५५: नेपाळचे राजे वीर विक्रम शाह त्रिभुवन यांचे निधन. (जन्मः २३ जून १९०६)

## भविष्य

**मेष** तुमच्या व्यक्तिमत्वाची उत्तम छाप पडेल. व्यापारी वगार्ला चांगला आर्थिक लाभ होईल. नवीन मित्र जोडाल. झोपेची तक्रार जाणवेल.

**वृषभ** व्यवहारी बुद्धिमत्ता वापराल. व्यावहारिक कल्पकता वापराल. पुढील गोष्टींचा अंदाज बांधवा लागेल. काही बाबी

**मिथुन** मनातील आकांक्षा पूर्ण होतील. चांगली संगत लाभेल. कामाच्या ठिकाणी कौतुकास पात्र व्हाल. मोठ्या लोकांच्या संगतीत वावराल.

**कर्क** मानसिक ताणापासून दूर राहावे. घरातील वडीलधार्या व्यक्तींचे मत विरोधी वाटू शकते. अंगीभूत कलागुण विकसित होण्यास वाव द्यावा. अति विचार करणे टाळावे.

**सिंह** जोडीदाराशी विचार-विनिमय कराल. भागीदारीत नवीन योजना आमलात आणाल. मुलांच्या हट्टीपणा कडे लक्ष ठेवा. तुमच्यातील धार्मिकता वाढीस लागेल. इतरांच्या आनंदात

**कन्या** पत्नीची प्रगती होईल. तुमचा जनसंपर्क वाढेल. सर्दी, खोकला यांसारखे त्रास संभवतात. जुगारातून लाभ संभवतो. गुंतवणुकीचा नवीन पर्याय शोधाल.

**तुला** पत्नीचा वरचष्मा राहील. जोडीदाराचा लाडिक हट्ट पुरवावा लागेल. आरोग्यात सुधारणा होईल. जवळचा प्रवास जपून करावा. कामाचा जोम वाढेल.

**वृश्चिक** बोलतांना सारासार विचार करून बोलावे. कसलाही उतावीळपणा करायला जाऊ नये. कौटुंबिक खर्चाचे योग्य नियोजन करावे. घरात नातेवाईक जमा होतील. दिवस हसत-खेळत घालवाल.

**धनु** रागाचा पारा आवरता घ्यावा लागेल. आततायीपणे वागू नये. कामाचा जोम वाढीस लागेल. काही अनपेक्षित बदल संभवतात. नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे.

**मकर** सामुदायिक गोष्टीपासून दूर राहावे. स्त्रीवगार्पासून सावधानता बाळगावी. धार्मिक यात्रा कराल. प्रवासात सावधानता बाळगावी लागेल. वादविवादात सामील होणे टाळा.

**कुंभ** मनमोकळ्या गप्पा मारता येतील. तुमच्या संभाषण कौशल्यावर सर्व खुश होतील. व्यावहारिक चातुर्य दाखवून द्याल. कौटुंबिक जबाबदारी पेलाल. हातातील कला जोपासावी. पोटाच्या तक्रारी जाणवू शकतात.

**मीन** वेळेचे महत्व जाणून वागावे. कोणालाही शब्द देतांना विचार करावा. व्यावसायिक लाभाचे योग्य नियोजन करावे. चटपटीत पदार्थ खाल. आवडी-निवडी बाबत दक्ष राहाल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# उत्तर-दक्षिण वादातील अर्थकारण

विकासासाठी आर्थिक/वित्तीय सहाय्य देत असताना केंद्र सरकार भेदभाव करते व विशेष करून दक्षिणेकडील राज्यांना अन्यायाची वागणूक मिळते, अशी तक्रार आता जोरदारपणे केली जात आहे. यामागील अर्थकारण आणि राजकारणही नीट लक्षात घ्यायला हवे.ह्याराज्यांनी आपला विकास साधण्यासाठी स्वायत्ततेने प्रयत्न करावेत, केंद्राकडून यासाठी जरूर ते मार्गदर्शन व साह्य दिले जाईल, देशातील आर्थिक-सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सर्व राज्ये व केंद्र सरकार एकोप्याने आणि सामंजस्याने झटतील असा सहकारी संघराज्यवाद चा भावार्थ होय.पण सध्या राज्ये व केंद्र सरकार यांच्यातील मतभेदांचे पर्यवसान संघर्षाच्या टप्प्यापर्यंत जाऊ पाहते आहे. विकासासाठी आर्थिक/वित्तीय सहाय्य देत असताना केंद्र सरकार भेदभाव करते व विशेष करून दक्षिणेकडील राज्यांना अन्यायाची वागणूक मिळते, अशी तक्रार आता जोरदारपणे केली जात आहे. परंतु यामागील राजकारण लक्षात घ्यायला हवे.केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, प. बंगाल, पंजाब आणि हिमाचल प्रदेश, या राज्यांत विरोधी पक्षांची सरकारे आहेत. डबल इंजिन सरकारे हा अभिनव सिद्धांत राबवण्याचा भाजप आटोकाट प्रयत्न करीत आहे. निवडणुका किंवा इतर मार्गाने राज्यांमध्येही सत्ता मिळवणे, त्याचवेळेस विरोधी पक्षांच्या राज्यांकडे दुर्लक्ष करणे, असा अजेंडा भाजप राबविताना दिसतो.परंतु विरोधकांच्या भूमिकेत तथ्यांश किती आहे, तेही तपासले पाहिजे. केंद्राकडून राज्यांना निधी मिळण्याचा एक प्रमुख घटनात्मक मार्ग म्हणजे वित्तआयोगाच्या शिफारशी. आतापर्यंत १५ आयोग नेमले गेले आहेत. प्रत्येक आयोग निधी हस्तांतरासाठी वेगवेगळी सूत्रे वापरतो व राज्यांना अधिकाधिक आर्थिक मदत देण्याचा प्रयत्न करतो.गेल्या काही आयोगांचा आढावा घेतला तर केंद्राकडील एकूण वाटपयोग्य निधीपैकी ३०.५ टक्के, ३२ टक्के, ४२ टक्के व ४१ टक्के पंधरावा, राज्यांच्या यादीतून जम्मू-काश्मीर कमी झाल्याने एक टक्का कमी असा वाढीव भाग केंद्राने सर्व राज्यांना मिळून वाटून दिला आहे.मात्र आंध्र, तेलंगण, तामिळनाडू, कर्नाटक व केरळ या पाच दक्षिणी राज्यांचा निराळा विचार केला तर त्यांचा एकूण निधी हस्तांतरातील एकत्रित टक्केवारी वाटा घटत गेला आहे. बाराव्या आयोगानुसार तो एकूणपैकी १९.७८ टक्के होता, तो सातत्याने घटून सध्याच्या पंधराव्या आयोगानुसार १५.८१ टक्के या पातळीपर्यंत उतरला आहे. वाटा उतरलेला दिसला तरी प्रत्यक्ष रकमा मात्र वाढत गेल्या आहेत. इतर अनेक राज्यांचाही टक्केवारी वाटा घटला आहे.राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी दरडोई उत्पन्न असणाऱ्या बिहार, उत्तर प्रदेश, झारखंड, आसाम, ओडिशा या गरीब राज्यांनाही बारावा आयोग ते पंधरावा आयोग या दरम्यान घटणारा टक्केवारी वाटा मिळाला. पंजाब या श्रीमंत व आताच्या विरोधी पक्षीय राज्याला गेल्या चारही आयोगांच्या दरम्यान वाढता टक्केवारी वाटा मिळाला आहे.विरोधी पक्षीय राज्यांवर जाणीवपूर्वक भेदभाव व अन्याय हा आरोप येथे फारसा टिकत नाही. शिवाय केंद्रीय करांमधील वाटा राज्यांना मिळणे हा एकच मार्ग नव्हे. घटनेच्या अनु. २७५ अनुसार राज्यांना सहाय्यक अनुदाने तसेच केंद्रपुरस्कृत योजनांमार्फत कोट्यवधी रुपयांचा निराळा निधी, वस्तू-सेवा करातील वाटा हे सर्व मिळत असतेच.आर्थिक-वित्तीय आघाडीवरील केंद्र-राज्य विसंवादाची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. नुकत्याच झालेल्या निवडणुकांनंतर कर्नाटकात काँग्रेस पक्षाचे सरकार आले. त्या राज्याने आपल्यावरील अन्यायाचा मुद्दा आक्रमकपणे लावून धरला आहे. ह्यसन २०१७ पासून आजपर्यंत केंद्र सरकारने आमचे १.९० लाख कोटी रु.चे नुकसान केले आहे हा मुद्दा घेऊन कर्नाटकाचे मुख्यमंत्री आणि इतर काही ज्येष्ठ मंत्री यांनी गेल्या महिन्यात थेट दिल्ली गाठून तेथे धरणे धरले.केरळ, पंजाब यांचे मंत्री आणि अनेक विरोधी पक्षांचे नेतेही त्यात सहभागी होते. पंधराव्या आयोगाच्या सर्व शिफारशी केंद्राने स्वीकारल्या असून त्यावर अंमलबजावणीही समाधानकारक रीतीने केली आहे, असे सरकारने लोकसभेत सांगितले. पण त्या आयोगाने शिफारस केलेली बंगळूर शहराच्या विकासासाठीची रु. सहा हजार कोटीची रक्कम देणे केंद्राने नाकारले आहे.तुम्हीच तो खर्च करा, असे केंद्राने कर्नाटकला सांगितले. अशी त्या राज्याची तक्रार आहे. केरळ सरकारने या पुढची पायरी गाठली आहे. चालू वर्षाचा विचार करता केंद्राने आमचे ५७ हजार ४०० कोटी रु. रकमेचे नुकसान केले आहे, असे केरळ सरकार म्हणते. आज रोजी कोट्यवधी रुपयांची केरळ राज्याची देणी थकली आहेत. केंद्राने केरळचे आरोप फेटाळले असून, ते सरकारच वित्तीय गैरव्यवस्थापनास जबाबदार आहे, असे म्हटले आहे.केरळचे कर्जः राज्य उत्पन्न गुणोत्तर ३५ टक्क्यांपर्यंत पोचले असून रिझर्व्ह बँकही केरळची वित्तीय स्थिती अत्यंत नाजूक असल्याचे म्हणते. मात्र घटनेतील अनु. १३१ चा आधार घेऊन केरळने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर लवकरच सुनावणी होईल. अनु. २९३ अनुसार प्रत्येक राज्याने कर्ज किती उभारायचे हे त्या राज्याच्या विधानसभेने ठरवायचे असते.संसदीय लोकशाहीमध्ये विधानसभेस सर्वोच्च मान दिला पाहिजे, त्यानुसार हे रास्तच आहे. पण अनु. २९३ व चा आधार घेऊन केंद्र सरकारने एका कार्यकारी आदेशाद्वारे राज्यांच्या कर्ज उभारणीवर मर्यादा घातली आहे. विधानसभेने जो निर्णय घेतला आहे, त्यावर केंद्राच्या आदेशाने अतिक्रमण केले आहे व त्यामुळे तो घटनाविरोधी ठरवावा, केंद्राचे हे धोरण वित्तीय संघराज्य तत्त्वाशी विसंगत आहे असे केरळ राज्य म्हणत आहे.

# भारतीय नौदलाचे सामर्थ्य आणि नवी आव्हाने




भारतीय नौदल अधिकाऱ्यांची तीनदिवसीय द्वैवार्षिक विशेष परिषद नुकतीच पार पडली. यंदाच्या परिषदेत काय चर्चा झाली, भारतीय नौदलापुढे काय आव्हाने आहेत, हिंद-प्रशांत क्षेत्रातील सामरिक स्थिती काय आहे, आदींचा घेतलेला धांडोळा... नौदल अधिकाऱ्यांची द्वैवार्षिक परिषद पाच ते आठ मार्चदरम्यान संपन्न झाली. ही परिषद एक संस्थात्मक व्यासपीठ आहे. ज्यात सागरी सुरक्षाविषयक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली जाते. परिषदेचे उद्घाटनसत्र ह्यआयएनएस विक्रमादित्य या विमानवाहू नौकेवर झाले, तर सात-आठ मार्च रोजी नवी दिल्लीत हायब्रीड स्वरूपात ही परिषद झाली. संरक्षणमंत्री, नौदलप्रमुख, संरक्षणसचिव, नौदलाच्या विविध विभागांचे प्रमुख, नौदल कमांडर, संरक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी आदींनी या परिषदेत सहभाग घेतला. पश्चिम आशिया व लगतच्या समुद्रातील अलीकडच्या घटना-घडामोडींना भारतीय नौदलाने धाडसी उत्तर दिले. त्यांचा प्रतिसाद तत्पर होता. समुद्री चाच्यांनी सागराखालील कापलेल्या केबल, चीनकडून पाकिस्तानकडे जाणाऱ्या अण्वस्त्रवाहू जहाजाला अटकाव आणि साडेतीन हजार किलोंच्या अमली पदार्थ तस्करीचे रॅकेट उद्ध्वस्त करणे या त्या तीन प्रमुख घटना आहेत. त्यांची दखल जगभरात घेण्यात आली. नौदल कमांडरांनी संघर्षाच्या स्पेक्ट्रममध्ये ऑपरेशनसाठी सतत सज्ज राहणे आवश्यक आहे. हिंदी महासागर क्षेत्रात शांतता आणि समृद्धीसाठी भारतीय नौदलाकडून नेतृत्वाची भूमिका अपेक्षित आहे. भविष्यातील युद्ध लक्षात घेता नौदल, लष्कर आणि हवाई दलाने संयुक्तरित्या कारवाई करणे, समन्वय राखणे आवश्यक आहे. यावरही या परिषदेत ऊहापोह झाला. या परिषदेत नौदल कमांडरनी विविध ह्यथिंक टँकह्वशी संवाद साधला. सूक्ष्म आणि लघु उद्योग, नवोदित आणि शैक्षणिक संस्था यांच्याशी सहकार्य कसे वाढवता येईल, यावर विशेष प्रकाश टाकण्यात आला. आत्मनिर्भरता उपक्रमांना पुढे नेण्यासाठी आणि संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भरता वाढवण्यासाठी यापुढील काळात कुठले धोरण असायला हवे यावरही चर्चा झाली. केवळ आशिया खंडच नाही तर अमेरिका खंडापासून पुढे ऑस्ट्रेलिया खंडापर्यंतच्या व्यापारात भारतीय महासागराचा वाटा सर्वाधिक आहे. मग, त्यात इंधन असो की खाद्यपदार्थ, औद्योगिक वा कृषिउपादने. उदाहरण द्यायचे तर दोनतृतीयांश इंधन मालवाहतूक भारतीय महासागरातून होते. हिंद-प्रशांत महासागराला जोडणारा दुवा आज कळीचा बनला आहे.

त्यामुळेच चीन, रशिया, अमेरिकासारख्या बलाढ्य देशांकडून या महासागराच्या परिसरात विविध प्रकारचे हस्तक्षेप आणि व्युहात्मक बाबी घडविल्या जात आहेत. ही बाब वाटते तेवढी साधी नाही. चीनसारख्या देशाकडून श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान यासारख्या आर्थिकदृष्ट्या पिचलेल्या देशांना लक्ष्य केले जात आहे. विकास आणि कर्जाचे जाळे फेकून त्यांचा भूभाग सामरिकतेसाठी आणि व्यूहरचनेसाठी वापरण्याचे इप्सित साध्य केले जात आहे. हा कावा भारताने वेळीच ओळखला आहे. विशेष म्हणजे दक्षिण आशियातील हा समुद्री व्यापार मार्ग लक्षात घेता भारतीय नौदल सर्वांत मोठे, सक्षम आणि आक्रमक आहे. अन्य लहान आणि अविकसित देशांकडे तेवढे सामर्थ्य नाही. अमेरिका, चीन, रशिया यांचे असले तरी त्यांचा भूभाग येथे नाही. त्यामुळे भारतासाठी ही जमेची बाजू आहे.

जगभरातील सर्वाधिक व्यापार किंवा मालवाहतूक की समुद्रमार्गेच होते. आणि भारतीय महासागरातूनच सर्वाधिक जहाजांची वाहतूक होते. त्यामुळे ही मालवाहतूकच कळीची आहे. हवाईमार्गे अद्यापही मालवाहतुकीचा सक्षम आणि स्वस्त पर्याय पुढे आलेला नाही. त्यामुळे सारी मदार सागरी मार्गांवरच आहे. अशा स्थितीत ही मालवाहतूक सुरक्षित व सक्षम राहणे आवश्यक आहे. समुद्री चाचे आणि दहशतवादी यांच्यापासून संरक्षण मिळवणे हे एक मोठे आव्हान आहे. गेल्या दोन दशकांत तर हिंद-प्रशांत महासागराकडे बलाढ्य देशांपाठोपाठ इतरांनीही आपला मोर्चा वळविला आहे. कारण, या देशांच्या आर्थिक नाड्या या मार्गावर अवलंबून आहेत. इंधनाची आयात असो की विविध उत्पादनांची निर्यात सारे काही याच मार्गातून होते. शिवाय वाढती स्पर्धा, रोजगाराची निकड, गुंतवणूक, स्थैर्य आणि महत्त्वाकांक्षा पूर्ततेची चढाओढ यामुळे दिवसागणिक व्यूहात्मक मांडणी बदलत आहे. शिवाय ड्रोन, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स यासारख्या अत्याधुनिक तंत्राचा वापरही वाढत आहे. अशा स्थितीत भारतीय नौदलावरील जबाबदारी कित्येक पटींनी वाढली आहे, याबाबत नौदल अधिकाऱ्यांत एकवाक्यता दिसून आली. समुद्री सुरक्षेचा प्रश्न २००८ मध्ये मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला. समुद्रमार्गे आलेल्या दहशतवाद्यांनी मुंबईत हाहाकार माजवला. या घटनेमुळे समुद्री सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला. देशाच्या सुरक्षेत समुद्र किनाऱ्यावर आणि समुद्रातील हालचालींवरही कडक लक्ष्य ठेवण्याची निकड समोर आली. याचाच एक भाग म्हणून भारताने नवी दिल्ली जवळील गुडगाव येथे भारतीय नौदलासाठी अत्याधुनिक माहिती व्यवस्थापन आणि विश्लेषण केंद्र (आयमॅक) स्थापना केले. २०१४ मध्ये तत्कालिन संरक्षणमंत्री मनोहर परीकर यांच्या हस्ते त्याचे उदघाटन झाले. या केंद्रातून महासागरामधील विविध हालचालींवर नजर ठेवली जाते. काही संशयास्पद बाब आढळली तर तातडीने संबंधित क्षेत्रातील नौदलाला कळविले जाते. नौदलाचे जहाज विनाविलंब त्या ठिकाणी जाते आणि पाहणी करते. महासागरातील व्यापारी जहाजांवर बारकाईने लक्ष ठेवतानाच विविध यंत्रणांशी समन्वय या केंद्रातून ठेवला जातो. या केंद्रातच ह्यइन्फॉर्मेशन फ्युजन सेंटरह्व आहे. २०१८ मध्ये हे केंद्र देशसेवेत आले. भारतीय महासागरालगतच्या ११ देशांशी भारताने करार केला आहे. या ११ देशांची नौदले महासागराच्या त्या त्या भागात टेहळणी करतात. हीच नौदले भारतीय नौदलाला विविध प्रकारची माहिती पुरवितात. फ्युजन सेंटरह्वमुळे ऑनलाइनरित्या हे सर्व देश आणि त्यांची नौदले एकमेकांशी जोडली गेली आहेत. याद्वारे माहितीचे आदानप्रदान वेगाने होतानाच महासागरावर बारकाईने लक्ष ठेवले जाते. समुद्री गुन्हे, चाचेगिरी, समुद्र चोरी, शस्त्रास्त्रांचा प्रसार, औषधांसह विविध उत्पादनांचे स्मगलिंग या साऱ्यांना रोखण्यासाठी हे केंद्र मोलाची भूमिका बजावते. सद्यःस्थितीत भारतीय महासागराच्या प्रदेशात कुठल्याही देशाकडे असे केंद्र नाही. सिंगापूर आणि अमेरिका यांनी असे केंद्र स्थापन केले आहे. भारतीय महासागराच्या सुरक्षेची कवचकुंडले म्हणून या केंद्राकडे पाहिले जाते. कालौघात उपग्रहांसह विविध आधुनिक आयुधांची जोड या केंद्राला देण्यात आली आहे. त्यामुळे सागरी टेहेळणीला नवा आयाम मिळाला आहे. मालदीव, श्रीलंका, म्यानमार, मिनिकॉय बेटे, मॉरिशस, इंडोनेशिया अशा विविध देशांशी सलोखा ठेवतानाच आपत्तीप्रसंगी सर्वप्रथम मदत करण्याचे भारतीय नौदलाचे कार्य जगभरात स्पृहणीय ठरले आहे. सामरिक आणि व्युहात्मकदृष्ट्या भारतीय नौदलाला सक्षम करणे, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने समृद्ध करणे अगत्याचे आहे. केवळ अण्विक नाही तर युद्धनौकांपासून टेहेळणीच्या विमाने आणि ड्रोनपर्यंत सर्वच पातळ्यांवर नौदल सुसज्ज असणे आवश्यक आहे. भारताची आर्थिक क्षेत्रातील घौडदोड रोखण्यासाठी अन्य प्रगत देश शांत नक्कीच बसणार नाहीत. त्यांच्याकडूनही वेगवेगळे डावपेच आखण्याचे, सामरिकदृष्ट्या भारताला खिंडीत गाठण्याचे काम होत आहे आणि यापुढेही होईल. या साऱ्यात भारतीय महासागरातील मालवाहतूक आणि विविध हालचाली महत्त्वाच्या ठरतात. भारतीय नौदलाकडे त्यादृष्टीनेही पाहणे गरजेचे आहे. वरिष्ठ नौदल अधिकाऱ्यांनी त्याविषयी स्पष्टपणे मते व्यक्त केली आहेत. नौदलाचे गुप्तहेर खातेही सक्षम हवे मालदीवसारखा अत्यंत अशक्त देश भारताला आव्हान देतो. हे काही सहजासहजी घडलेले नाही किंवा घडत नाही. त्या पाठीमागचे राजकारण, डावपेच आणि सामरिक हालचाली काय आहेत हे शोधणे गरजेचे आहे. तसे झाले तरच जशास तसे उत्तर देणे शक्य होणार आहे. परिणामी, नौदलाचे गुप्तहेर खातेही सक्षम व्हायला हवे. मालदीवमधून भारतीय नौदल पूर्णपणे परत घ्यावे लागले तर यापुढील काळासाठी भारताची भूमिका काय असेल आणि वेळेप्रसंगी मालदीवसारखाच भक्कम तळ कुठे निर्माण करता येईल, यावरही परिषदेत सांगोपांग चर्चा झाली आहे. अशा परिषदेचे सार लक्षात घेऊन भारत सरकारने योग्य ती पावले उचलणे गरजेचे आहे. तसे झाले नाही तर अशा परिषदा केवळ औपचारिकता ठरतील.

## रमाबाई आंबेडकर नगर पुनर्विकासः झोपु प्राधिकरणाच्या सर्वेक्षणाला सोमवारपासून सुरुवात, पात्रता निश्चितीही करणार

■**मुंबई** ,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सोमवार पासून घाटकोपरमधील रमाबाई आंबेडकर नगरच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी तेथील झोपड्यांचे सर्वेक्षण करणार आहे. रहिवाशांच्या पात्रता निश्चितीच्या अनुषंगाने हे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) पूर्वमुक्त मार्गाचा घाटकोपर ते ठाणे असा विस्तार करणार आहे. या विस्तारीकरणात रमाबाई आंबेडकर येथील काही झोपड्या बाधित होणार आहेत. केवळ या बाधित झोपड्यांचे पुनर्वसन न करता संपूर्ण रमाबाई आंबेडकर नगरचा, येथील १६ हजार ५७५ झोपड्यांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय एमएमआरडीएने



घेतला आहे. या प्रकल्पास मान्यता मिळाली असून संयुक्त भागीदारी तत्त्वावर एमएमआरडीए आणि झोपु प्राधिकरणाकडून हे पुनर्वसन केले जाणार आहे. झोपड्यांचे सर्वेक्षण, पात्रता निश्चिती, झोपड्या रिकाम्या करणे, जागा मोकळी करून देणे आणि पुनर्वसित इमारती ताब्यात घेत पात्र रहिवाशांना घरांचा ताबा देणे ही कामे झोपु करणार आहे.
तर इमारतींच्या बांधकामाची संपूर्ण जबाबदारी एमएमआरडीएवर असणार आहे. ५ मार्चला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत एमएमआरडीए आणि झोपु प्राधिकरणात संयुक्त करार झाला आहे. करार झाल्याने झोपु प्राधिकरणातर्फे आता रमाबाई आंबेडकर नगरातील झोपड्यांच्या सर्वेक्षणास सोमवारपासून सुरुवात होईल, अशी माहिती झोपुतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. २०१६ मध्ये समूह सर्वेक्षण मोहिमेअंतर्गत येथील १६ हजार ५७५ झोपड्यांचे सर्वेक्षण आणि रहिवाशांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण झाले आहे. आता या आठ वर्षांत झोपड्यांचे खरेदी-विक्री व्यवहार झाले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे याबाबतचे सर्वेक्षण करून रहिवाशांची पात्रता निश्चिती केली जाणार असल्याचेही या अधिकाऱ्याने सांगितले. हे सर्वेक्षण पूर्ण होण्यास एक ते दीड महिना लागण्याची शक्यता आहे.

## 'जय श्रीराम' म्हणण्याची सक्ती करून तरूणावर टोळक्याचा हल्ला; अंगावर केली लघुशंका

■**सोलापूर** , एका तरूणीचा विनयभंग केल्याचा राग मनात धरून एका भाजी विक्रेत्या तरूणाचे अपहरण करून त्यास दहा-बाराजणांच्या टोळक्याने बेदम मारहाण केली. मारहाण करताना जय श्रीराम म्हणण्याची बळजबरी करीत त्याच्या अंगावर लघुशंका करण्यापर्यंत जमावाची मजल गेल्याचा धक्कादायक आणि अमानुष प्रकार उजेडात आला आहे. शहर हद्दवाढ भागातील शेळगी येथे घडलेल्या या घटनेप्रकरणी पीडित अयान मुर्तूज बागवान या तरूणाने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली आहे. त्यानुसार सार्थक खुबा, अभिषेक दुलंगे, सचिन ढोणे, भाईजी ( गणेश गुरूभेटी, सचिन दुर्गे, प्रशांत पवार, बनी कोळी, बिरू पुजारी, भाईजी, धीरज, वायके, निखिल (पूर्ण नावे माहित नाहीत.) व इतर तीन-चार तरूणांची नावे आरोपी म्हणून समोर आली आहेत. यापैकी दोघांना अटक करण्यात आली



आहे. हा प्रकार पाच दिवसांनी उजेडात आला आहे. जखमी अयान बागवान (वय २०) हा दुपारी शेळगी येथे चाचा किराणा दुकानाजवळ थांबला असताना समर्थ खुबा हा त्याच्या साथीदारांसह येऊन बागवान यास बळजबरीने त्याच्या दुचाकीवर बसवून बार्शी रस्त्यावरील टोलनाक्याच्या पुढे मोकळ्या रानात नेले. बागवान याचा मित्र यासीन पटेल यास खोटे कारण सांगून गणेश गुरूभेटी यास सोबत बोलावून घेतले. नंतर बागवान याचा भ्रमणध्वनी जबरदस्तीने हिसकावून घेऊन त्याला नग्न केले आणि लाथाबुक्क्यांनी, लाकडी दांडक्याने, कंबरपट्ट्याने त्याला बेदम मारहाण केली. तू आपल्या गल्लीतील मुलींना का छेडतो, असे म्हणून मारहाण करताना त्याला जय श्रीराम म्हण असे म्हणून त्याच्या अंगावर लघुशंका करण्यात आली. त्याचा मित्र यासीन पटेल यालाही बेदम मारहाण करण्यात आली. दोघा हल्लेखोरांनी फायटर आणि खंजीरसारखे हत्यार दाखवून, या दोघांना धमकावल्याचे फियार्दीत म्हटले आहे. जखमी अयान बागवान याच्याविरूध्द काही दिवसांपूर्वी एका तरूणीचा विनयभंग केल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यातूनच त्याचे टोळक्याकडून अपहरण, हल्ला, जय श्रीराम म्हणण्याची सक्ती आणि अंगावर लघवी करण्याचा प्रकार घडल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

## Domestic cricket to the fore? Tendulkar, Rohit's presence at Ranji Trophy final wins the internet

■ **Mumbai** : The growing emphasis on the importance of domestic cricket and red-ball games got another shot in the arm with Sachin Tendulkar and Rohit Sharma attending the third day's play during the Ranji Trophy final between Mumbai and Vidarbha on Tuesday. Coming off an excellent 4-1 series win over England with a depleted Indian side and heading into IPL 2024 season, Rohit appeared relaxed and was spotted in the Mumbai dressing room during the afternoon, with the dominant hosts running away with the Ranji Trophy final contest



on the field. With the backdrop of Shreyas Iyer missing out on a BCCI contract and also losing his spot in the Indian Test side, Rohit witnessed the right-handed batter getting back into his groove but also throwing away his wicket when he was just one hit away from triple-figure mark. In the morning session on Tuesday, the TV camera kept panning towards the MCA President Box wherein sat the legendary Tendulkar to witness the action. Tendulkar was spotted sitting alongside former players Dilip Vengsarkar, Subroto Banerjee, a few officials as well as Chandrakant Pandit, the incumbent coach of Madhya Pradesh and Kolkata Knight Riders. The Little Master, who had termed Mumbai's batting as 'ordinary' on the opening day when the 41-time champions were shot out for a mere 224, appeared satisfied with the improvement shown in the second innings wherein Musheer Khan (135), Ajinkya Rahane (73) and Iyer flayed the opposition.

Tendulkar took to his social media platforms to share his observations. "Mumbai displayed a lot more discipline, patience and commitment in the second innings," he wrote. "First, a crucial partnership between @ajinkyarahane88 and Musheer Khan put Mumbai in a solid position. Then, Musheer's stand with @ShreyasIyer15 has taken the game further away from Vidarbha. Had a good time watching the game today with my friends and colleagues," Tendulkar added. The presence of Rohit and Tendulkar came a day after another Mumbai and India legend, Sunil Gavaskar, showed up. Gavaskar sat with cricket administrator Ratnakar Shetty and former women's cricket team skipper Diana Edulji as well as former captain and chairman of the Mumbai selection committee, Milind Rege.

## Indian Made Foreign Liquor worth Rs 91.73 lakh seized in Palghar

■ **Palghar,** The Palghar district rural police in Maharashtra seized Indian Made Foreign Liquor (IMFL) worth Rs 91.72 lakh from a truck, an official said on Tuesday, reported the PTI. The seizure was made by the police on the Mumbai-Ahmedabad Highway in Palghar district of Maharashtra, the official said, the news agency reported. According to the PTI, based on a tip-off, the Palghar Police officials intercepted the Gujarat-bound truck at Dahpchari checkpost on Monday, the official said.While the truck driver managed to flee the scene, the police officials searched the truck and recovered IMFL worth Rs 91.72 lakh from the vehicle, he said.A case has been registered under



relevant provisions of the Indian Penal Code and Prohibition Act and further investigations in the matter are being done, the official said, according to the PTI.In light of the upcoming Lok Sabha elections 2024, the Palghar district police have stepped up vigil to crack down on liquor smuggling, District Superintendent of Police Balasaheb Patil said, as per the PTI.Meanwhile, in an another incident, the Thane Police in Maharashtra have arrested a man dealing in scrapped goods and his employee in Maharashtra's Thane district for allegedly selling expired food items, an official said on Tuesday, reported news agency PTI. The 42-year-old waste goods dealer was handed over some expired food items by a food delivery company for destroying them. However, he used to recycle them for sale in the market, the official from Shanti Nagar police station in Thane said quoting a complaint by the company's representative, reported PTI.

# घरातूनच मेफेड्रॉनची विक्री करणाऱ्या दाम्पत्यासह तिघे अटकेत

## ५ लाख ४० हजारांचे अमली पदार्थ जप्त



**नवी मुंबई** : घरातूनच एमडी (मेफेड्रॉन) या अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या दाम्पत्यासह तिघांना कोपरखैरणे पोलिसांनी शनिवारी पहाटे अटक केली आहे. संदीप मुनिराम शर्मा (२३) त्याची पत्नी निर्मला संदीप शर्मा (२३) व संदीपचा भाऊ वरुण मुनीराम शर्मा (२१) अशी या तिघांची नावे असून या तिघांनी विक्रीसाठी आपल्या घरामध्ये आणून ठेवलेले ५४ ग्रॅम वजनाचे ५ लाख ४० हजार रुपये किंमतीचे एमडी(मेफेड्रॉन) जप्त केले आहे. हे अंमली पदार्थ त्यांनी कुठून आणले याबाबत पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

कोपरखैरणे सेक्टर-१६ एसएस-१ टाईपच्या रूम नं. ११५ मध्ये राहणाऱ्या व्यक्ती अमली पदार्थाची विक्री करत असल्याची माहिती कोपरखैरणे पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील व त्यांच्या पथकाने शनिवारी पहाटे सव्वा एक वाजण्याच्या सुमारास कोपरखैरणे सेक्टर-१६ मधील संशयित घरावर छापा मारला. यावेळी घरातील एक महिला व दोन पुरुष पोलिसांशी झटापट करून पळून जाण्याचा प्रयत्न केला असता, पोलिसांनी तिघांची धरपकड केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी कपाटातील ड्रॉवरमध्ये काळ्या प्लास्टिकच्या पिशवीमध्ये एमडी हा अमली पदार्थ विक्री करण्यासाठी ठेवल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्यांच्या घरातील कपाटात ठेवलेला ५४ ग्रॅम वजनाचा ५ लाख ४० हजार रुपये किंमतीचा एमडी हा अमली पदार्थ जप्त केला. एमडी हा अमली पदार्थ त्यांनी कोणाकडून आणला? व तो कोणाला विकणार होते? याबाबत चौकशी केली असता, त्यांनी हे अमली पदार्थ बारीक पारदर्शक प्लास्टिकच्या पिशवीमध्ये भरून त्याची विक्री करत असल्याची कबुली केली. या तिघांविरोधात एनडीपीएस कलमांतर्गत गुन्हा दाखल करून तिघांना अटक केली.

या कारवाईत अटक करण्यात आलेले जोडपे व त्यांचे नातेवाईक हे तिघेही राहत्या घरामधून एमडी हा अंमली पदार्थ विक्री करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार कारवाई करून तिघांना अटक करण्यात आली आहे. तसेच त्यांच्याकडून ५ लाख ४० लाख रुपये किंमतीचे एमडी जप्त केले आहे. मुंबईतील डोंगरी भागातून त्यांनी हे अंमली पदार्थ विक्रीसाठी आणल्याची माहिती दिली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू असल्याची माहिती कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी दिली.

# घरफोड्या करणारी आंतरराज्यीय बांगलादेशी टोळी गजाआड

## गुन्हे शाखेची कारवाई ■ ५३ गुन्हे उघडकीस आणण्यात यश



**मुंबई** : बांगलादेशातून घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश करून मुंबई आणि महाराष्ट्रासह तेलंगण, गुजरात, पश्चिम बंगालमध्ये घरफोड्या करणाऱ्या बांगलादेशी टोळीला गजाआड करण्यात गुन्हे शाखेच्या मालमत्ता कक्षाला यश आले आहे. गुन्हे शाखेने टोळीचा म्होरक्या शाकीर ऊर्फ गुड्डू हैदर शेख (४५) याच्यासह पाच आरोपींना बेड्या ठोकल्या असून टोळीने देशभरात केलेले ५३ गुन्हे उघडकीस आणले आहेत. घरफोड्या करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा म्होरक्या शाकीर हा काही गुन्ह्यातआरोपी असल्याने गुन्हे शाखेच्या मालमत्ता कक्षाचे पथक त्याच्या मागावर होते. याच दरम्यान शाकीर हा जालना जिल्ह्यातील परतूर येथे असल्याची माहिती मालमत्ता कक्षाला मिळाली. त्यानुसार, पो.नि. संदीप निगडे यांच्या नेतृत्वातील पथकाने शुक्रवारी पहाटे शाकीर वास्तव्यास असलेल्या दुमजली घरावर छापेमारी केली. शाकीर आणि त्याचे पाच साथीदार मालमत्ता कक्षाच्या हाती लागले. मालमत्ता कक्षाने शाकीरच्या साथीदारांकडे केलेल्या चौकशीत शाकीर आणि त्याचे चार साथीदार हे बांगलादेशी नागरिक असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. शाकीर शेख ऊर्फ गुड्डू याने त्याच्या साथीदारांच्या मदतीने मुंबई आणि महाराष्ट्रासह तेलंगण, गुजरात, पश्चिम बंगालमध्ये एकूण ५३ गुन्हे केल्याची कबुली पोलिसांना दिली आहे. बांगलादेशमधील रहिवासी असलेला आरोपी शाकीर हा टोळीचा म्होरक्या आहे. त्याने घरफोड्या करण्यासाठी एक आंतरराज्यीय टोळी बनवली आहे.

■ आरोपी शाकीरला अटक केल्यानंतर चार गुन्ह्यांमध्ये त्याला शिक्षा सुनावण्यात आली आहे. तर, आठ गुन्ह्यांमध्ये त्याच्या विरोधात अजामीनपात्र आणि एका गुन्ह्यात जामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आले आहे. शाकीर हा गुन्ह्यात चोरी केलेल्या मालमत्तेपैकी ८० टक्के मालमत्ता स्वतःजवळ ठेवत होता आणि उरलेली २० टक्के मालमत्ता साथीदारांना वाटत होता.

■ शाकीर आणि त्याच्या साथीदारांनी मुंबईतील १८, भुसावळ आणि जालना जिल्ह्यात तीन, तेलंगण–निजामाबाद येथे १३, तेलंगण–हैदराबाद येथे सात, गुजरात–अहमदाबाद येथे चार, पश्चिम बंगाल हावडा, वर्धमान येथे सात अशा एकूण ५३ गुन्ह्यांची कबुली दिली आहे. या आरोपींना न्यायालयाने १८ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून त्यांच्याकडे कसून चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

■ गुन्हे शाखेच्या प्रकटीकरणचे उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक शशिकांत पवार आणि पो. नि. संदीप निगडे यांच्यासह स.फौ. उमेश राऊत, रमेश पासी, पो.ह. अरुण सावंत, चिंतामण इरनक, तुषार सावंत, विनोद पदमन, विश्वनाथ पोळ, सचिन सावंत, संतोष औटे, पो. शि. आदित्य जाधव, रंजना निचिते, शरद मुकुंदे यांच्या पथकाने ही कामगिरी पार पाडली आहे.

२०१३ मध्ये महाराष्ट्रात येऊन तो मुंब्रा येथे राहू लागला. येथील एका महिलेशी विवाह करून तो येथे राहू लागला. पुढे, तो गुन्ह्यांच्या दुनियेत उतरला. बांगलादेशमधून घुसखोरीच्या मार्गाने तो साथीदारांसह पश्चिम बंगालमध्ये येत होता. येथून विमानाने प्रवास करून गुजरात, महाराष्ट्र, तेलंगण अशा राज्यातील विविध शहरांमध्ये जाऊन रेकी करून घरफोडीचे गुन्हे करत होता. घरफोडी केल्यानंतर शाकीर हा लगेच पश्चिम बंगालमार्गे बांगलादेशमध्ये पळून जात होता. त्यामुळे त्याला पकडणे पोलिसांसाठी एक आव्हान होते.

# स्टॉक मार्केटमध्ये नफा कमवण्याच्या आमिषाने फसवणूक




**मुंबई** : स्टॉक मार्केट, शेअर्स आणि आयपीओमध्ये भरपूर नफा कमवण्याचे आमिष दाखवून सायबर ठगांनी घाटकोपरमधील एका तरुणाला ७ लाख ३४ हजार रुपयांना गंडा घातला आहे. याप्रकरणी फसवणुकीच्या भादंवि कलमांसह पॉस्को कायद्यान्वये गुन्हा दाखल करून घाटकोपर पोलीस अधिक तपास करत आहेत.

घाटकोपर पश्चिमेकडील पारशीवाडीमध्ये राहत असलेला ३५ वर्षीय चंदन हा अंधेरीमधील एका खासगी कंपनीमध्ये अकाऊंटंट आहे. १६ फेब्रुवारीच्या दुपारी त्याला व्हॉट्सॲपवर व्हीआयपी सर्व्हिस नावाच्या ग्रुपमध्ये ॲड करण्यात आले. चंदनने ग्रुप उघडून बघितला असता पूजा नावाच्या महिलेने हा ग्रुप तयार केला होता. या ग्रुपमध्ये मॅरिलिना नावाची महिला चॅट करत होती. ॲंजल इन्व्हेस्टमेंट प्रोग्रामच्या माध्यमातून शेअर मार्केट गुंतवणूक करून त्याबदल्यात भरघोस मोबदला देत असल्याचे त्यात नमूद करण्यात आले होते. चंदनने प्रतिसाद देताच त्याला गुंतवणूक करण्याची माहिती देण्यात आली. पुढे त्याला अल्फा ॲक्सिस हे ॲप डाऊनलोड करण्यास भाग पाडून कोड नंबर देत नोंदणी करून घेतली. मॅरिलिनाने पैसे गुंतवणूक करण्यासाठी अल्फा ॲक्सिससच्या कस्टमर केअर जोनाथन सायमन याच्याशी सपर्क साधून मार्गदर्शन आणि पैसे भरण्यासाठी बँक खाते क्रमांक घेण्यास सांगितले. पुढे अल्फा ॲक्सिस स्टॉक क्लब नावाच्या ग्रुपमध्ये व्हॉट्सॲपच्या माध्यमातून मॅरिलिना हिने चंदनला स्टॉक मार्केट, शेअर्स आणि आयपीओ खरेदी करण्यासाठी मार्गदर्शन केले. मॅरिलिनाने गुंतवणुकीसाठी वेगवेगळ्या कंपन्यांचे आयपीओ, शेअर्स खरेदी, स्टॉक खरेदी करण्यास सांगून एकूण ७ लाख ३४ हजार रुपये उकळले. १६ ते २८ फेब्रुवारीदरम्यान ही घटना घडली. अखेर आपली फसवणूक झाल्याची खात्री पटल्याने चंदनने पूजा दीक्षित, मॅरिलिना, जोनाथन सायमन आणि संबंधिताविरोधात तक्रार दिली आहे.

# अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार

**मुंबई** : शेजारी राहणाऱ्या १३ वर्षांच्या मुलाला मोबाईलमध्ये पॉर्न व्हिडीओ दाखवून २४ वर्षीय तरुणाने त्याच्यावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केल्याची घटना कांदिवलीमध्ये घडली. याप्रकरणी भादंवि आणि पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करून समतानगर पोलीस अधिक तपास करत आहेत. कांदिवली पूर्व परिसरात राहत असलेला १३ वर्षीय पीडित मुलगा घरी एकटा असताना आरोपी नेहमी त्याच्या घरी जात असे. त्याला मोबाईलमध्ये पॉर्न व्हिडीओ दाखवून त्याच्यावर लैंगिक अत्याचार करत असे. याबाबत कोणाकडेही वाच्यता केल्यास पॉर्न व्हिडीओ बनवून घरातील मंडळींना पाठवण्याची धमकी देऊन त्याला शिवीगाळ आणि मारहाण करत असे. रोजचे अत्याचार सहन न झाल्याने अखेर मुलाने घडलेला प्रकार आई-वडिलांना सांगितला. त्यानंतर कुटुंबीयांनी मुलाला सोबत घेऊन समतानगर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली आहे.

# ऑनलाइन बेटिंगच्या नादात मॅनेजरने लुटली स्वत:चीच बँक




**मुंबई** : ऑनलाइन बेटिंगच्या नादात चोरीच्या घटना घडताना आपण अनेकदा पाहिल्या आहेत. मात्र आता भारतीय स्टेट बँकेच्या मॅनेजरने स्वतःच्याच बँकेतील तीन कोटी रुपयांच्या सोने लुटल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ऑनलाइन बेटिंग खेळण्याचा नाद या बँक मॅनेजरला एवढा लागला त्याने बँकेचे लॉकर फोडून त्यातील सोने चोरी केले आणि ते विकले. भांडुप पश्चिममध्ये ही धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी मुलुंड शाखेच्या पर्सनल ब्रांचमध्ये काम करणाऱ्या सर्व्हिस मॅनेजरसह एकाला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुलुंड-नाहूर येथील रूनवाल ग्रीन या ठिकाणी असलेल्या एसबीआयच्या शाखेत अमित कुमरा हे प्रशासक म्हणून काम करतात, तर आरोपी मनोज म्हस्के हा मॅनेजर म्हणून काम करतो. 27 फेब्रुवारी रोजी मनोज म्हस्के रजेवर असताना प्रशासक अमित कुमार यांच्याकडे लॉकरची जबाबदारी होती. अमित कुमार त्यादिवशी लॉकरमध्ये रोख रक्कम आणि दागिने जमा करण्यासाठी गेले असता त्यांना सोन्याच्या दागिन्यांची अनेक पाकिटे गायब असल्याचे निदर्शनास आले. बँकेतील कागदपत्रे तपासली असता त्यांच्या शाखेने 63 ग्राहकांचे सोनं तारण ठेवून कर्ज दिले होते. मात्र लॉकरमध्ये असलेल्या 63 सोन्याच्या पाकिटांपैकी 59 पाकिटे गहाळ झाली होती आणि फक्त 4 पाकिटे शिल्लक होती. लॉकरला दोन चाव्या असून दोन्ही चाव्या वापरूनच लॉकर उघडता येणे शक्य होते. एक चावी सर्व्हिस मॅनेजरकडे, तर दुसरी शाखेत कॅश इनचार्ज म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीकडे असते. 59 पाकिटे गहाळ असल्यामुळे अमित कुमार यांनी ही बाब बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ या प्रकरणाची गंभीर दखल घेत सुट्टीवर असलेल्या सर्व्हिस मॅनेजर मनोज म्हस्के यांना तातडीने बँकत बोलावून घेतले आमि गहाळ झालेल्या सोन्याच्या पाकिटाबाबत विचारले. यावेळी मनोज म्हस्के याने सोन गायब केल्याची कबुली देत, गायब सोन्यापैकी काही सोने दुसरीकडे गहाण ठेवले तर काही सोने विकल्याची कबुली दिली. तसेच गायब केलेले सोने लवकरच परतो करतो, असे म्हणत त्याने बँकेकडे वेळ मागून घेतला. पण बँकेने त्याला कुठलाही वेळ न देता अमित कुमार यांनी भांडुप पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल केली. पोलिसांनी याप्रकरणी मनोज म्हस्के याची चौकशी केली असता फरीद शेख असे दुसऱ्या आरोपीचे नाव समोर आले. मनोज म्हस्के हा बँकेतून चोरी करत होता, तर फरीद शेख मनोजला सोनं विकण्यास मदत करत होता, अशी माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. याप्रकरणी भांडुप पोलिसानी मनोज म्हस्के आणि त्याचा साथीदार फरीद शेख यांना भादंवि कलम 409 अन्वये गुन्हा दाखल करून अटक केली आहे. पोलिसांनी सांगितले की, मनोज म्हस्के याला ऑनलाइन सट्टा खेळण्याची सवय आहे. त्यामुळे त्याने सोने चोरी करून दुसऱ्या ठिकाणी गहाण ठेवले आहे. त्यामुळे सोनं कुठे गहाण ठेवले आहे, यासंदर्भात तपास करत असल्याची माहिती भांडुप पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय खंडागळे यांनी दिली.

# नवी मुंबईत एआयचा वापर करून प्राध्यापकाला लाखोचा गंडा

**नवी मुंबई** : नवी मुंबईत एआयचा वापर करून प्राध्यपकाकडून एक लाख रुपये उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. फसवणूक झालेली व्यक्ती



ही सायन येथील एका महाविद्यालयात प्राध्यापक आहे. महाविद्यालयात असताना प्राध्यपकाला एका आंतरराष्ट्रीय नंबरवरून व्हॉट्सॲप कॉल आला. समोरून बोलणाया व्यक्तीने आपण सीबीआयमधून बोलत असल्याचे सांगत फसवणूक केली. एआयचा वापर करून आरोपीने मुलाचा आवाज मॅच करून प्राध्यपका लाखोचा गंडा घातल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे. नवी मुंबईच्या सीवूडमध्ये ही घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्राध्यपक महाविद्यालयात असताना आरोपीने त्यांना व्हॉट्सॲप कॉल केला आणि सांगितले की, तुमच्या मुलाला बलात्काराच्या गुन्हात पकडण्यात आले आहे. त्याच्यावरील अटकेची कारवाई टाळण्यासाठी आरोपीने एक लाख रुपयांची मागणई केली. यावेळी आरोपीने प्राध्यपकाला विचार करण्याची संधी न देता तत्काळ निर्णय घेण्यास भाग पाडले. धक्कादायक म्हणाजे प्राध्यपकाला खात्री पटावी यासाठी आरोपीने प्राध्यपकांचे मुलासोबत बोलणेही करून दिले. मुलाचे बोलणे ऐकून घाबरलेल्या प्राध्यपकांनी आरोपीच्या सांगण्यावरून विविध बँक खात्यांमध्ये तब्बल एक लाख रुपये जमा केले. त्यानंतर प्राध्यापकाला आपल्या मुलाची काळजी वाटत असल्याने त्यांनी त्याला फोन केला असता त्यांचा मुलगा घरीच होतो.

प्राध्यपकाच्या लक्षात आले की, आपली फसवणूक झाली आहे. त्यांनी घडलेला सगळा प्रकार आपल्या मुलाला सांगितला. त्यानंतर सायबर पोलिसांकडे घडलेल्या प्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली. यानंतर सायबर पोलीस कामाला लागले असून त्यांनी संबधित मुलाचा आवाज वडिलांना ऐकवण्यासाठी अगोदर बाप मुलाचे फोनवरील बोलणे रेकॉर्ड करण्यात आले होते का? आवाज रेकॉर्ड करण्यासाठी मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर केला गेला का? याचा आता शोध घेत आहेत.

# इव्हेंट वेंडरसाठी दिलेल्या दोन कोटींचा अपहार करून फसवणूक

**मुंबई** : इव्हेंट वेंडरसाठी दिलेल्या सुमारे दोन कोटी रुपयांचा अपहार करून एका खाजगी इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीची फसवणूक झाल्याचा प्रकार अंधेरी परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी रोहन धनुका या सिनिअर अकाऊंट मॅनेजरविरुद्ध आंबोली पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरु केला आहे. तक्रारदार विपीन मदनलाल चौहाण हे व्यावसायिक असून ते त्यांच्या कुटुंबियांसोबत अंधेरीतील आझादनगर, विठ्ठल दर्शन अपार्टमेंटमध्ये राहतात. त्यांच्या मालकीची एक इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी असून या कंपनीचे मुख्य कार्यालय अंधेरीतील जे. पी रोड, अमेया हाऊसच्या पहिल्या मजल्यावर आहे. याच कंपनीत नोव्हेंबर 2021 रोजी रोहन धनुका हा सिनिअर मॅनेजर अकाऊंट म्हणून रुजू झाला होता. आपल्या कामातून त्याने विपीन चौहाण यांचा विश्वास संपादन केला, मात्र काही महिन्यानंतर त्याने त्याच्या पदाचा गैरवापर करून कंपनीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला होता.

2 एप्रिल 2022 ते 9 ऑक्टोंबर 2023 या कालाधीत त्याने कंपनीच्या बँक खात्यातून विविध इव्हेंट वेंडर यांना देण्याची एकूण रक्कमेपैकी 2 कोटी 15 लाख रुपयांची रक्कम स्वतच्या बँक खात्यात ट्रान्स्फर केली होती. अशा प्रकारे त्याने पैशांचा अपहार करून कंपनीची फसवणूक केली होती. ऑडिटदरम्यान हा प्रकार उघडकीस येताच विपीन चौहाण यांनी या संपूर्ण प्रकरणाची शहानिशा सुरू केली. त्यात रोहनने आपल्या पदाचा गैरवापर करून कंपनीच्या पैशांचा अपहार केल्याचे उघडकीस आले. या घटनेनंतर त्यांनी आंबोली पोलिसांत तक्रार केली.

# वाशीतील आर्केस्ट्रा बारमध्ये राडा

## बारबालेच्या वादातून ग्राहकाने बार चालकावर रोखले रिव्हॉल्व्हर, दोघे अटकेत


**नवी मुंबई** : एका बारबालेवरून झालेल्या वादातून एका ग्राहकाने वाशीतील मधुबन ऑर्केस्ट्रा बार चालकाला ठार मारण्यासाठी त्याच्यावर रिव्हॉल्व्हर उगारल्याची घटना रविवारी रात्री वाशीमध्ये घडली. सुदैवाने इतरांनी त्याला पकडल्यामुळे कुठलीही अनुचित घटना या ठिकाणी घडली नाही. या घटनेनंतर वाशी पोलिसांनी बार चालकावर रिव्हॉल्व्हर उगारणारा ग्राहक व त्याचा साथीदार तसेच बारबाला या तिघांविरोधात ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे. तसेच त्याच्याकडे असलेले रिव्हॉल्व्हर जप्त केले आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये मनोज खंडेलवाल (५२) व रितेश सिंह (२९) या दोघांचा समावेश आहे. तर ज्या बारबालेमुळे हा सर्व प्रकार घडला, त्या बारबालेचे नाव पूजा ऊर्फ आलिशा असे असून ती पूर्वी कोपरखैरणेतील नटराज बारमध्ये काम करत होती. काही महिन्यापूर्वी पूजा वाशीतील मधुबन बारमध्ये कामाला लागली होती. त्यामुळे नटराज बारमध्ये जाणारा डोंबिवली येथील मनोज खंडेलवाल तसेच इतर ग्राहकांनी वाशीतील पूजाची नृत्यकला पाहण्यासाठी मधुबन ऑर्केस्ट्रा बारमध्ये जाण्यास सुरुवात केली होती. मात्र काही दिवसांपूर्वी पूजाचे वाशीतील मधुबन ऑर्केस्ट्रा बारचा चालक स्वप्निल मोरे याच्यासोबत वाद झाल्याने तिने त्या बारमधील कामदेखील सोडले होते.

दरम्यान, रविवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास बारचा चालक स्वप्निल मोरे हा पार्किंगच्या आवारात बारमध्ये काम करणारे संतोष, सुनील व उमेश यांच्यासोबत बोलत उभा होता. यावेळी पूजा, मनोज खंडेलवाल व रितेश सिंह यांच्यासोबत त्याठिकाणी गेली होती. त्यानंतर तिने स्वप्निल मोरे याच्यासोबत हुज्जत घालण्यास सुरुवात केली. यावेळी स्वप्निल मोरे याने दोघांच्या वैयक्तिक भांडणात पडायचे नाही, असे बोलल्याने पूजा सोबत आलेल्या मनोज खंडेलवाल याला राग आल्याने त्याने मोरे याला शिवीगाळ करूनमारहाण करण्यास सुरुवात केली.

त्यामुळे स्वप्निल मोरे याने त्याला प्रतिकार केला असता, मनोज खंडेलवाल याने त्याचा पूजाच्या इशाऱ्यानंतर रितेश सिंह याने मनोज खंडेलवाल याला रिव्हॉल्व्हर दिल्यानंतर मनोजने सदर रिव्हॉल्व्हर स्वप्निल मोरे याला मारण्यासाठी उगारला. मात्र यावेळी स्वप्निल मोरेच्या सहकाऱ्यांनी त्याला पकडल्याने या ठिकाणी कुठलीही अनुचित घटना घडली नाही.

# बोरिवलीतील इमारतीचे बांधकाम सुरु असताना मोठी दुर्घटना; 3 मजुरांचा मृत्यू, एकजण जखमी

**बोरिवली** : बोरिवली पश्चिमेकडील इमारतीचे बांधकाम सुरु असताना एक दुर्दैवी घटना घडली आहे. इमारतीवर काम करणाऱ्या तीन मजुरांचा खाली पडून मृत्यू झाला आहे तर एक जण जखमी झाला आहे. पीटीआयने यासंदर्भातील माहिती दिली आहे. इमारतीचे काम सुरु असताना सोळाव्या मजल्यावरील मचान कोसळले. यात तिघांचा मृत्यू झाला आहे. एका मजुराची प्रकृती चिंताजनक असून त्याला शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या होत्या. दुपारी एकच्या सुमारास ही घटना घडली असल्याचं सांगण्यात येतंय. साम टीव्हीच्या माहितीनुसार, बोरिवली पश्चिमेकडील कल्पना चावला चौकात सोनी वाडी येथे एका २४ मजली इमारतीचे काम सुरु होते. मजूर या इमारतीच्या सोळाव्या मजल्यावर काम करत होते. अचानक मचान कोसळल्याने चार मजूर जखमी झाले. त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण, तिघांना गंभीर दुखापत झाली होती. डॉक्टरांनी तीन मजुरांना मृत घोषित केले. एकाला आयसीयूमध्ये ठेवण्यात आलं आहे.





# पशुसंवर्धन विभागामार्फत पंचसूत्री कार्यक्रमाचे आयोजन

**ठाणे,** सद्यस्थितीत हवामान बदलामुळे शेतीव्यवसायात काहिशी अनिश्चितता निर्माण झाली असली, तरी शेतीला पूरक किंबहुना मुख्य व्यवसाय म्हणून शेतकऱ्यांनी पशुसंवर्धनाशी संबंधित व्यवसायाची वाट निवडणे गरजेचे बनले आहे. पशुसंवर्धन विभागाच्या योजनांचा शेतकरी बांधवांना लाभ देत त्यांच्यामध्ये पुन्हा नवी उमेद जागविण्याचा व नवीन पशुउद्योजक निर्माण करण्याचा प्रयत्न पशुसंवर्धन विभाग करीत आहे. आगामी काळात महाराष्ट्र राज्यात केवळ संख्यात्मक नाही, तर गुणात्मक पशुधनाची पिढी निर्माण करण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन विभागाने धोरण राबविण्यास सुरुवात केली आहे.